https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२७७ मंगळवार दि.१६ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-277 Tuesday, Dt.16 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मुंडे पॅटर्नचा भेसळखोरांच्या साम्राज्यावर बुलडोझर

## दूध, पनीर, गुटखा, औषध माफियांचे धाबे दणाणले

## राज्यभर धाडसत्र, कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त, अनेकांवर गुन्हे दाखल

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांनी अवघ्या काही दिवसांत राज्यभर भेसळखोरां विरोधात उघडलेली मोहीम सध्या राज्यातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे. दूध, पनीर, खवा, तूप, आईस्क्रीम, गुटखा, पानमसाला, औषध आणि अन्य खाद्यपदार्थांमधील भेसळीच्या साखळीवर थेट हल्ला चढवत मुंडे यांनी अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या यंत्रणेला धक्का दिला आहे. गेल्या आठ-दहा दिवसांत राज्यभर राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत कोट्यवधी रुपयांचे भेसळयुक्त व बंदी घातलेले पदार्थ जप्त करण्यात आले. अनेक आस्थापनांवर टाळे ठोकण्यात आले तर आरोपींना अटकही करण्यात आली. यामुळे अन्नसुरक्षेच्या नावाखाली सुरू असलेला काळाबाजार आणि नागरिकांच्या आरोग्याशी चाललेला खेळ उघडकीस आला आहे. पुण्यासह विविध भागांत एफडीए ने एकाच वेळी धाडसत्र राबवून संशयित पनीर, खवा, तूप आणि दुग्धजन्य पदार्थांचे लाखो रुपयांचे साठे जप्त केले. अनेक ठिकाणी उत्पादनांवर लेबल नव्हते, खरेदीची कागदपत्रे नव्हती, तर काही ठिकाणी अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत अन्नपदार्थ तयार व साठवले जात असल्याचे आढळले. यामुळे सामान्य नागरिक दररोज वापरत असलेल्या दूध, दही, ताक, पनीर, खवा यांसारख्या पदार्थांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तज्ज्ञांच्या मते अशा भेसळयुक्त पदार्थांमुळे किडनी, यकृत, पचनसंस्था आणि लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.धाबे दणाणले आहेत.







### १० कोटींच्या भेसळ साम्राज्याला हादरा...

विविध मोहिमांतील अधिकृत आकडे एकत्र केल्यास,३०० हून अधिक आस्थापने तपासणीच्या कक्षेत १०० पेक्षा अधिक धाडी टाकण्यात आल्या असून १० कोटींपेक्षा अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच १५० हून अधिक आरोपींना अटक करत १०० पेक्षा अधिक आस्थापने सील किंवा कारवाईच्या कक्षेत आहेत.हजारो किलो भेसळयुक्त दूध, खवा, पनीर, तूप, गुटखा, पानमसाला, कृत्रिमरीत्या पिकवलेले फळे आणि इतर खाद्यपदार्थ जप्त केले आहेत.

### गुटखा व भेसळविरोधी मोहीम...

२०३ आस्थापनांवर कारवाई करत ८६ आस्थापने सील करण्यात आली असून सुमारे १.५८ कोटींचा मुद्देमाल जप्त करत १०२ जणांना अटक केली आहे.

### १० जून राज्यव्यापी कारवाई...

राज्यभर मोठे धाडसत्र टाकून ३.९५ कोटींचा भेसळयुक्त व बंदी घातलेला माल जप्त करण्यात आला आहे. यातील प्रामुख्याने २१ आरोपी अटक करण्यात आली असून १७ आस्थापने सील करण्यात आली आहेत.

### ५० ठिकाणी धाडी...

३.६७ कोटींचा माल जप्त करण्यात आला असून तब्बल १७ आरोपी अटक करण्यात आले आहेत. ८ आस्थापने सील करून ३ वाहने ही जप्त करण्यात आली आहेत.

### पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांत धाडी

३७ लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करत १४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून अनेकांना अटक करण्यात आली आहे.

### सुमारे १०० उत्पादन व विक्री केंद्रांवर छापे

२५ एफआयआर दाखल करत ३३ आरोपी अटक करण्यात आले आहेत. त्यांच्याकडून ४० लाखांपेक्षा जास्त किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. तर २७ आस्थापने बंद/सील केली आहेत.

### निकृष्ट अन्नपदार्थ विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ...

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंडे यांनी सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र ही राज्यव्यापी मोहीम सुरू केली. अवघ्या १५-२० दिवसांत राज्यभर झालेल्या कारवाईमुळे भेसळखोर, गुटखा माफिया आणि निकृष्ट अन्नपदार्थ विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. दिनांक २९ ते ३१ मे २०२६ दरम्यान १९ जिल्ह्यांमध्ये विशेष मोहीम राबवून ४७ आस्थापनांची तपासणी करत ८४, ३३५ किलो संशयित व भेसळयुक्त अन्नसाठा सुमारे ९७.१७ लाख रुपयांचा जप्त करण्यात आला आहे.

### तर महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण होईल...

अन्न म्हणजे जीवन. मात्र नफेखोरीच्या हव्यासापोटी नागरिकांच्या ताटात भेसळयुक्त दूध, दही, ताक, पनीर आणि इतर खाद्यपदार्थ पोहोचविणाऱ्या साखळीवर पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर घाव घातला जात आहे. तुकाराम मुंडे यांच्या धडक मोहिमेमुळे केवळ भेसळखोरच नव्हे तर संपूर्ण अन्नसुरक्षा यंत्रणाच जागी झाली आहे. ही मोहीम सातत्याने सुरू राहिली तर महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास मोठी मदत होणार आहे.

## एसटी बीड विभागातील नियमबाह्य बदल्या व बढत्यांची चौकशी करून विभाग नियंत्रकावर कारवाई करा- बबन वडमारे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागात दि. १ जानेवारी २०२४ पासून झालेल्या बदल्या, बढत्या, पदनियुक्त्या आणि प्रतिनियुक्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकार्यांवर कारवाई करावी तसेच विभाग नियंत्रक यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी इंटकचे प्रादेशिक सचिव बबनराव वडमारे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मुंबई तसेच मध्यवर्ती कार्यालयातील सुरक्षा व दक्षता अधिकार्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.



तक्रारीनुसार, बीड विभागात विविध पदांवरील बढत्या आणि बदल्या करताना सेवा ज्येष्ठतेचे निकष डावलण्यात आले असून नियम व परिपत्रकांना बगल देत काही कर्मचार्यांना लाभ मिळवून देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. वाहक ते लिपीक-टंकलेखक तसेच वाहक ते वाहतूक नियंत्रक या पदांवरील पदोन्नती प्रक्रियेत वरिष्ठतेचा विचार न करता निर्णय घेण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.तसेच चालक, वाहक, सहाय्यक वाहतूक नियंत्रक, एटीआय, टीआय, पर्यवेक्षक आणि इतर पदांवरील नेमणुका व प्रतिनियुक्त्यांमध्येही नियमबाह्य पद्धतीचा अवलंब करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून अनेक निर्णय हे नियमांच्या चौकटीबाहेर जाऊन घेण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारीत वाहतूक निरीक्षकांच्या बदल्यांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. महामंडळाच्या संबंधित परिपत्रकानुसार बदली प्रक्रिया राबविणे अपेक्षित असताना काही प्रकरणांमध्ये त्या नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही अधिकार्यांच्या बदल्या करताना पर्याय न मागविता किंवा निर्धारित निकष न लावता निर्णय घेण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय काही वाहतूक निरीक्षक व इतर अधिकार्यांच्या बदल्या अन्यायकारक पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून कार्यकाळ पूर्ण न झालेल्या कर्मचार्यांनाही बदलीला सामोरे जावे लागल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे संबंधित कर्मचार्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, बदल्यांमध्ये अंशतः बदल करून देण्यासाठी काही मध्यस्थांमार्फत आर्थिक व्यवहारांची मागणी करण्यात आल्याचाही गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमून सर्व संबंधित कागदपत्रे, आदेश आणि बदली प्रक्रियेची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

बीड विभागातील दि. १ जानेवारी २०२४ पासून आजपर्यंत झालेल्या सर्व बदल्या, बढत्या, प्रतिनियुक्त्या, पदनियुक्त्या आणि प्रशासकीय आदेशांची स्वतंत्रपणे तपासणी करण्यात यावी. तसेच या सर्व प्रकरणात विभाग नियंत्रक यांची चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी आणि दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी इंटकचे प्रादेशिक सचिव बबनराव वडमारे यांनी आपल्या तक्रारीत केली आहे.

## शिवसेनेच्या वतीने बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन -जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड प्रतिनीधी

महायुती सरकारने केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी आहे. या कर्जमाफी मधील जाचक अटी व शर्ती रद्द करून शेतक-यांना सरसकट कर्जमाफी करावी या मागणीसाठी दि. १६ जुन २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कलेक्टर ऑफिस बीड वर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीसाठी सकाळी ९.३० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स, बीड येथे शेतकरी बांधवांसह शिवसेनेचे सर्व जिल्हा, तालुका, शहर व अन्य पदाधिकारी



या सर्वांनी एकत्रित जमावे तसेच ही रॅली शिवसेना कार्यालयापासुन सुरू होऊन महापुरूषांना अभिवादन करीत कलेक्टर ऑफिस बीड पर्यंत पोहचेल.या रॅलीसाठी बहुसंख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे व झोपलेल्या सरकारला जागे करावे असे आवाहन जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केले आहे.

## छाया सरोदे यांना मानाचा 'युवा लोकमित्र जिव्हाळा माउली सन्मान २०२६' जाहीर.!

रक्ताची नाती दुरावलेल्या बेघर वृद्ध, अनाथ व वंचितांना मायेची भाकर देणाऱ्या 'माउली'चा बीडमध्ये होणार भव्य गौरव

बीड /प्रतिनिधी

आजच्या स्वार्थी जगात जिथे रक्ताची नाती पैशासाठी दुरावतात, तिथे बीड शहरातील भाजी मंडई परिसरातील 'जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात' निराधार, अपंग, वंचित वृद्ध महिला व पुरुष आणि अनाथ बालकांसाठी प्रत्यक्ष 'माउली' बनून उभ्या ठाकलेल्या छाया सरोदे यांना यंदाचा अत्यंत प्रतिष्ठेचा आणि मानाचा 'युवा लोकमित्र जिव्हाळा माउली सन्मान २०२६' जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली आहे. समाजाकडून विसरल्या गेलेल्या, हतबल झालेल्या वृद्ध व वंचितांच्या अंधकारमय जीवनात छाया सरोदे या मायेचा प्रकाश बनल्या आहेत. या बेघर निवारा केंद्रात त्या रोज न चुकता, अहोरात्र कष्ट करून दिवसातून दोन वेळा जेवण तयार करतात. केवळ अन्न शिजवण्यापुरते मर्यादित न राहता, या निवाऱ्यातील आजारी, असहाय्य वृद्धांची सेवा करणे, त्यांचे अश्रू पुसणे आणि त्यांना हक्काच्या कुटुंबासारखा जिव्हाळा देणे, हेच त्यांनी आपल्या जीवनाचे अंतिम व्रत मानले आहे.कोणत्याही प्रसिद्धीची किंवा मोबदल्याची अपेक्षा न ठेवता, अत्यंत निभृतपणे आणि प्रामाणिकपणे सुरू असलेल्या त्यांच्या या अलौकिक मानवी सेवेची दखल 'युवा लोकमित्र पुरस्कार समिती'ने घेतली आहे. समाजातील शेवटच्या घटकाची अहोरात्र सेवा करणाऱ्या अशा खऱ्याखुऱ्या 'माउली'चा गौरव करताना 'युवा लोकमित्र' परिवाराला सार्थ अभिमान वाटत आहे, असे उद्गार संपादक शेख ताहेर जाफर यांनी काढले आहेत.हा गौरव सोहळा येत्या शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे पार पडणार आहे.



या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. छाया सरोदे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच बीडमधील सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांसह संपूर्ण जिल्हाभरातून त्यांच्या या अथांग मातृत्वाचा आणि सेवेचा गौरव होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



बीड: मातृभूमी प्रतिष्ठान बीडच्या वतीने दैनिक समर्थ राजयोग चे संपादक वैभव स्वामी यांना पत्रकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय पत्रकार रत्न पुरस्काराने सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे व लक्ष्मण चाटे उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# घंटी नव्या आशांची...!

बीड - आज १५ जून महाराष्ट्रातील लाखो शाळांच्या प्रांगणात पुन्हा एकदा घंटा वाजली, वर्गखोल्या गजबजल्या, दप्तरांचे ओझे खांद्यावर घेत विद्यार्थी नव्या उत्साहाने शाळेकडे निघाले. सुट्ट्यांच्या आनंदानंतर शिक्षणाच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. शाळेचा पहिला दिवस हा केवळ नवीन वर्गात जाण्याचा दिवस नसतो, तर तो नवीन स्वप्नांचा, नवीन संकल्पांचा आणि आयुष्याला योग्य दिशा देण्याचा प्रारंभबिंदू असतो.शिक्षण हे केवळ गुण मिळविण्याचे साधन नाही, तर माणूस घडविण्याची प्रक्रिया आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यावर मोठा ताण निर्माण झाला आहे. गुण, टक्केवारी, प्रवेश परीक्षा आणि करिअर यांच्याभोवतीच शिक्षण फिरत असल्याचे चित्र दिसते. मात्र शिक्षणाचा खरा उद्देश केवळ यशस्वी नव्हे, तर सुसंस्कृत, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविणे हा आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता , डिजिटल तंत्रज्ञान आणि इंटरनेटच्या युगात विद्यार्थ्यांसमोर ज्ञानाचे अमर्याद दालन खुले झाले आहे. परंतु याचबरोबर चुकीची माहिती, मोबाईलचे व्यसन, सोशल मीडियाचा अतिरेक आणि मानसिक तणाव यांसारखी आव्हानेही उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर साधन म्हणून करावा, स्वामी म्हणून नाही. पुस्तके, शिक्षक आणि अनुभव यांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही.विद्यार्थ्यांसाठी हे वर्ष केवळ अभ्यासाचे नसून स्वतःला ओळखण्याचे वर्ष ठरावे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष क्षमता असते. कोणीतरी विज्ञानात चमकतो, कोणीतरी कलेत, कोणीतरी क्रीडेत तर कोणीतरी समाजकार्यात. त्यामुळे स्वतःची तुलना इतरांशी करण्याऐवजी स्वतःचा विकास करण्यावर भर दिला पाहिजे. अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकण्याची वृत्ती जोपासली पाहिजे.

शिक्षकांची भूमिकाही यापेक्षा कमी महत्त्वाची नाही. शिक्षक हा केवळ पाठ्यपुस्तक शिकवणारा व्यक्ती नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा शिल्पकार असतो. विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, जिज्ञासा वाढविणे आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देणे ही आजची गरज आहे. नवीन शैक्षणिक धोरण, कौशल्याधारित शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे, तर जीवनासाठी तयार करणे हेच खरे शिक्षण ठरेल.पालकांनीही मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकण्याऐवजी त्यांचे मित्र, मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान बनले पाहिजे. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते हे स्वीकारून त्याच्या आवडीनिवडींना प्रोत्साहन दिले पाहिजे. गुणांपेक्षा संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाला अधिक महत्त्व दिले पाहिजे.आज शाळेची घंटा वाजली आहे, ती केवळ वर्ग सुरू होण्याची सूचना नाही; ती ज्ञान, संस्कार, शिस्त आणि उज्ज्वल भविष्यासाठीची हाक आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत, शिक्षकांनी ती साकार करण्यासाठी दिशा द्यावी आणि पालकांनी त्या प्रवासात विश्वासाने साथ द्यावी. शिक्षणाचा हा त्रिवेणी संगमच महाराष्ट्राच्या आणि देशाच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया ठरणार आहे.नवीन शैक्षणिक वर्षाच्या या शुभारंभी प्रत्येक विद्यार्थ्याने एक संकल्प करावा - मी केवळ परीक्षेत यशस्वी होण्यासाठी नव्हे, तर चांगला माणूस बनण्यासाठी शिक्षण घेईन. आणि प्रत्येक शिक्षकानेही मनोमन ठरवावे. मी विद्यार्थ्यांना केवळ धडा शिकवणार नाही, तर जीवन जगण्याची दिशा देईन.शाळेची घंटा वाजली आहे... आता वेळ आहे ज्ञानाच्या प्रकाशाने भविष्य उजळविण्याची..!

- संपादकीय विभाग दैनिक समर्थ राजयोग

# एल निनोची चाहूल - पाणी अडवण्याची जबाबदारी

मुंबई - 'एल निनो' ही फक्त हवामानाची घटना नाही, ती मानवी समाजाची सत्वपरीक्षा आहे. शास्त्रज्ञांनी यंदा 'सुपर एल निनो'चा इशारा दिला आहे. त्यामुळे मान्सून लांबणे, पावसाचे अनिश्चित चक्र, दुष्काळाची टांगती तलवार हे चित्र समोर येत आहे.

पण भीतीने हातपाय गाळून चालणार नाही. एल निनोचा इतिहास सांगतो की, ज्या समाजाने आधीच तयारी केली, पाणी अडवले, जमीन वाचवली, तोच समाज संकटातून ताठ मानेने उभा राहिला. म्हणूनच मृद व जलसंधारण मंत्री या नात्याने महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी, प्रत्येक गावाला आवाहन आहे की, आता पाणी अडवण्याची तयारी करावी.

निसर्गाचा इशारा

'एल निनो' हा पृथ्वीच्या नैसर्गिक हवामानचक्राचा भाग आहे. पण गेल्या १०० वर्षांत मानवी हस्तक्षेपामुळे त्याची तीव्रता वाढली आहे. वृक्षतोड, जमिनीचा ऱ्हास, भूजलाचा बेसुमार उपसा आदी कारणांमुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे. परिणामी एकीकडे महापूर, दुसरीकडे तीव्र दुष्काळ. हा इतिहास आपल्याला शिकवतो की, एल निनोच्या काळात जलसंधारण नसेल तर मानवाला मोठी किंमत मोजावी लागते.

माझ्या मते चिंता करण्याऐवजी आपण कृती करू या. मृद व जलसंधारण विभागाने 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' मोहीम हाती घेतली आहे. कारण एल निनोच्या वर्षात पाऊस कमी पडला तरी, पडलेला प्रत्येक थेंब जर आपण अडवला, तर दुष्काळ टाळू शकतो.

शेतकऱ्यांसाठी एल निनो काळातील चार मंत्र

१. पाणी अडवा, पाणी जिरवा: बांधबंदिस्ती, सीसीटी, नाल्यांचे खोलीकरण ही कामे युद्धपातळीवर करावी. पडलेल्या पावसाचा थेंब अन थेंब वाहून जाऊ न देता तो जमिनीत मुरला पाहिजे.

२. गाळ म्हणजे सोने: धरणे, तलाव आणि बंधाऱ्यातील गाळ काढून तो शेतात टाका. एल निनोच्या वर्षात हा गाळ ओलावा धरून ठेवतो आणि उत्पादन वाढवतो. तसेच धरणातील गाळ निघाल्याने पाणी साठवण क्षमता ३० टक्याने वाढते.

३. पीक पद्धती बदला: एल निनोच्या वर्षात जास्त पाणी लागणारी पिक पद्धती घेणे टाळावे. कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीची पिके, डाळी, तेलबिया यांना प्राधान्य द्यावे. हवामान खात्याचा अंदाज घेऊन पेरणी करावी.

४. झाडे लावा, जीवन वाचवा : वृक्षतोड ही एल निनोची तीव्रता वाढवते. प्रत्येक शेतकऱ्याने शेताच्या बांधावर, शेताच्या कडेने किमान १० झाडे लावावी.

शासन खंबीरपणे पाठीशी

महाराष्ट्र शासनाने मृद व जलसंधारण विभागासाठी निधी वाढवला आहे. गावागावात जलसंधारणाची कामे सुरू आहेत. पण हे फक्त शासनाचे काम नाही, ही जनचळवळ आहे. 'पाणी अडवले तरच जीवन जगेल' हे सूत्र प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे.

एल निनो, दुष्काळ हे सगळे जोडले गेले आहेत. पण आपला शेतकरी हा मातीचा कैवारी आहे. त्याने अनेक संकटे झेलली आहेत. म्हणून मी सांगतो की, एल निनोची भीती बाळगू नका. तयारी करा. कारण संकटापूर्वी व्यवस्थापन करणारा समाजच इतिहास घडवतो. पाऊस निसर्ग देईल, पण पाणी अडवण्याची जबाबदारी आपली आहे. चला, मिळून महाराष्ट्राला 'जलसमृद्ध महाराष्ट्र' बनवूया.

शब्दांकन...
**संजय राठोड,**
मृद व जलसंधारण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशात १२ वर्षांत रामराज्याची संकल्पना साकारली - भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

बीड प्रतिनिधी

बीड येथील सोमेश्वर महादेव मंदिरात सुरू असलेल्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज रामायण पारायणाच्या पावन प्रसंगी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सलग १२ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल भगवान श्रीरामचंद्रांचे विशेष पूजन व महाआरती करण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि राष्ट्रसेवेच्या संकल्पांना अधिक बळ प्राप्त व्हावे, अशी प्रार्थना श्रीराम चरणी करण्यात आली.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, पीएम किसान सन्मान निधी, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या योजनांमुळे कोट्यवधी गरीब, शेतकरी, महिला आणि वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडले आहे. तर दुसरीकडे राम मंदिर उभारणी, काशी विश्वनाथ धाम, महाकाल लोक आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी घेतलेले निर्णय हे देशाच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ देणारे ठरले आहेत.जागतिक पातळीवर भारताचा सन्मान वाढविणे, आत्मनिर्भर भारताचा पाया मजबूत करणे, पायाभूत सुविधांचा विक्रमी विकास, डिजिटल क्रांती आणि



जनतेला केंद्रस्थानी ठेवून राबविलेल्या योजनांमुळे मोदी यांचे नेतृत्व देशासाठी प्रेरणादायी ठरले आहे असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी उपस्थित भाविकांसमोर मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध जनकल्याणकारी, विकासाभिमुख आणि राष्ट्रहिताच्या उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. तसेच प्रभू श्रीरामांची कृपा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत राष्ट्रावर सदैव राहो, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

याप्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथआण्णा शिराळे, बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, ज्येष्ठ नेते प्रा. देविदास नागरगोजे, पत्रकार प्रमोद पुसरेकर, राजेंद्र चरखा यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.





बीड (जिमाका)

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच 'विद्यार्थ्यांचे हसतमुख स्वागत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुरुवात' हा संदेश देत जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव अभियान आनंदी आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडले. या अभियानाच्या अनुषंगाने बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शिरूर कासार तालुक्यातील खोकरमोहा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली व विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या भेटीदरम्यान शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शाळेतील भौतिक सुविधा तसेच प्रवेशोत्सवानिमित्त राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचा थेट आढावा घेतला. त्यांनी इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प आणि शैक्षणिक साहित्य देऊन कौतुक केले.भेट प्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी अतिशय मनमोकळा संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली. नवोदित विद्यार्थ्यांना नियमित शाळेत येऊन शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रोत्साहित केले. पालकांनी आपल्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी दररोज आणि नियमितपणे शाळेत पाठवावे,असे आवाहनही त्यांनी यावेळी उपस्थित पालकांना केले.

## उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी धर्माबादहून मुंबईकडे पदयात्रा
## निर्णय घ्या अन्यथा संघर्ष तीव्र करु - डॉ. रामचंद्र भरांडे

धर्माबाद / अशोक पडोळे

अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी धर्माबाद येथून मुंबईकडे निघालेल्या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक न्यायासाठी सुरू असलेल्या या लढ्याला संघर्ष आणि स्वाभिमानाचे स्वरूप प्राप्त झाले असून, राज्य सरकारने उपवर्गीकरणाबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा वंचित समाजाचा संघर्ष अधिक तीव्र होईल, असा इशारा लोकस्वराज्य आंदोलनाचे नेते डॉ. प्रा. रामचंद्र भरांडे यांनी दिला.

हुतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या क्रांतिभूमीत आयोजित सभेत ते बोलत होते. अनुसूचित जातीतील लाभवंचित घटकांना आरक्षणाचा न्याय्य वाटा मिळवून देण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.राज्यातील अनेक कुटुंबे आजही मूलभूत सुविधा आणि प्रतिनिधित्वापासून वंचित आहेत. सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासनाने ठोस पाऊल उचलण्याची गरज आहे,असे भरांडे म्हणाले.



### हलगीच्या गजरात पदयात्रेला प्रारंभ..

धर्माबाद शहरातील साठेनगर परिसरातून पदयात्रेला उत्साहात प्रारंभ झाला. हलगीच्या तालावर नृत्य, घोषणाबाजी आणि फटाक्यांच्या आतषबाजीत कार्यकर्त्यांनी सामाजिक न्यायाच्या मागण्यांचा जयघोष केला. पदयात्रेच्या प्रारंभीच वातावरण घोषणांनी दणाणून गेले होते.

पदयात्रा थांबविण्याबाबत प्रशासनाकडून विनंत्या होत असल्याचा उल्लेख करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपवर्गीकरणाचा विषय मंजूर करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करा. समाजाच्या न्याय्य मागणीची पूर्तता झाल्यास आम्ही संघर्षाऐवजी स्वागतासाठी उभे राहू असे ते म्हणाले.गेल्या अनेक वर्षांपासून उपवर्गीकरणाचा प्रश्न प्रलंबित असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी काही राजकीय नेतृत्वावरही टीका केली. समाजातील उपेक्षा, अपमान आणि संधींच्या असमानतेमुळे वंचित घटकांमध्ये असंतोष वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंबईतील आंदोलनानंतर कार्यकर्त्यांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांचा संदर्भ देत त्यांनी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. न्यायासाठी आवाज उठविणाऱ्यांवर कारवाई केली जाते मात्र मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होते असे ते म्हणाले.

अनुसूचित जातींतील ४६ लाभवंचित घटकांना आरक्षणाचा योग्य लाभ मिळावा, हीच उपवर्गीकरणामागील भूमिका असल्याचे स्पष्ट करत भरांडे म्हणाले, आम्ही कोणाचाही हक्क हिरावून घेण्याची मागणी करत नाही. आमच्या वाट्याचा न्याय मागत आहोत.राज्यभरातून पदयात्रेला वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे सांगून त्यांनी समाजबांधवांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.संविधान, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा उल्लेख करत त्यांनी संघटित लढ्याची गरज अधोरेखित केली.

या पदयात्रेत लोकस्वराज्य आंदोलनाचे मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष व्ही. जी. डोईवाड, रावसाहेब पवार, धोंडूपंत बनसोडे, नागोराव कुडके, एम. जे. पिंगळे, बी. एम. गोणारकर, लक्ष्मण निदानकर, नागोराव कमलाकर, पत्रकार सुरेश घाळे, जी. आर. गोणारकर, नारायण इबितवार, बाबुराव गोणारकर, शिवराम भंगारे, देवराव निदानकर, सुरेश निदानकर, अनिल गोणारकर, ऐश्वर्या गायकवाड यांच्यासह महिला व समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## बेलगाव वस्ती शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा





बीड प्रतिनिधी

आज दिनांक १५ जून २०२६ सोमवार रोजी बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलगाव वस्ती केंद्र लिंबागणेश अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ चा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साही आणि आनंदी वातावरणामध्ये साजरा करण्यात आला.पहिल्याच दिवशी शंभर टक्के प्रवेश पट नोंदणी करण्यात आली.

या प्रवेशोत्सव सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुमंत कोळपे, चेअरमन कोळपे साहेब, उपाध्यक्ष श्रीमती जयश्री ईश्वर कोळपे, सर्वश्री पालक लक्ष्मण कोळपे, अश्विनी कोळपे, सुषमा कोळपे व गावकरी मंडळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेचे मुख्याध्यापक भारत रोहिदास पाखरे सर आणि सहशिक्षिका श्रीमती जे बी कानडे तसेच शालेय पोषण आहाराच्या कमलताई, रतनताई आणि तुकाराम कोळपे यांच्या यशस्वी परिश्रमातून करण्यात आले. शाळेत पहिल्याच दिवशी प्रवेश केलेल्या सर्व बालचिमुकल्यांचे स्वागत पुष्पगुच्छ आणि पुष्पहार घालून अनोख्या पद्धतीने करण्यात आले.विशेष बाब म्हणजे पहिल्या दिवशी मोफत शालेय पाठ्यपुस्तकेसह गणवेश व शालेय साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात आले. या कार्यक्रमाची यशस्वी सांगता अल्पोपहाराने करण्यात आली.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बदनापुर यांचे न्यायालय**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६१० दि.१०.०६.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **संदीप नामदेव गिते रा.अकोला ता.बदनापूर जि.जालना** यांनी यांच्या **मुला**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | क्रिधान संदीप गिते | मुलगा | १७.१२.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, बदनापूर**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०८१ दि.३०.०९.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री आसराम फयाजोद्दीन कादरी, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | आसमा फयाजोद्दीन कादरी | स्वतः | १६.१०.१९७८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३४७/२०२६**
**विजयाबाई भ्र. शिवाजी काळे व इतर बि, निरकं**
**(मार्फत - ॲड. आर. व्ही. आव्हाड, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे शिवाजी तबाजी काळे, रा. तरटेवाडी पो. सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २३/०४/२०२६ रोजी तरटेवाडी पो. सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले /झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ विजयाबाई भ्र. शिवाजी काळे, वय ५३ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. तरटेवाडी पो. सिरसमार्ग ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ अनिल पि. शिवाजी काळे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. तरटेवाडी पो. सिरसमार्ग ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ ललिता भ्र. हनुमंत महारनोर, वय ३२ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. धस पिंपळगांव ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र. ४ मनिषा भ्र. परमेश्वर वाघमोडे, वय ३० वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. सिरसमार्ग ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५ रुख्मीन भ्र. परमेश्वर मार्कड, वय ३५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. तरटेवाडी, पो. सिरसमार्ग, ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत शिवाजी तबाजी काळे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - २१/०७/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहीर नोटीस**
**श्रीमती व्ही.पी. पाटील, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**निशाणी क. /ड**
**विशेष अर्ज क्र. ०१/२०२६**
**भाग्यश्री रामेश्वर पवार .... धनको**
**विरुध्द**
**शामसुंदर किसन नन्नवरे.... ऋणको**
**जेडी क्र**

४) शाहिन बेगम पत्नी महंमद रफिक यांची
वय-४९, व्यवसाय-घरकाम, रा.मुखेड ता.मुखेड जि.नांदेड
५) शहेनाज बेगम पत्नी अब्दुल मुजलिब यांची
वय-४९ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा. रा.वरीलप्रमाणे
६) एजाज अहमद हबीबुद्दीन वय-४५, व्यवसाय-व्यवसाय, रा.वरीलप्रमाणे
७) इलियास अहमद हबीबुद्दीन यांचा मुलगा, वय-४१, व्यवसाय-व्यापार, रहिवासी: वर नमूद केल्याप्रमाणे
८) मुमताज बेगम, जैनुद्दीन यांची पत्नी, वय ४४, घरकाम करत असून, निवास व्यवस्था वरीलप्रमाणे.
९) नुरजहान बेगम व/ओ महंमद मुसद्दिक, वय-३९, व्यवसाय-घरकाम, वरीलप्रमाणे

या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी धनको यांनी (सोबतच्या नकले प्रमाणे याकरता तुमच्या विरुध्द उपरोक्त दरखास्त दाखल केला आहे.आणि ज्या अर्थी, तुम्हाला बजावण्यात आलेले नोटीस सामान्य प्रकियेद्वारे बजावता येत नाहीये, कारण तुम्ही नोटीस स्विकारणे टाळत आहात किंवा तुमची राहण्याची जागा अज्ञात आहे.

त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या आदेश ५, नियम २० (१-अ) अन्वये मा. न्यायालयाच्या आदेशावरुन तुम्हाला या जाहीर सूचनेद्वारे आदेशीत करण्यात येते की, तुम्ही दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः किंवा नियुक्त वकिलामार्फत हजर राहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, सदर दरखास्त तुमच्या अनुपस्थितीत (एकतर्फी) चालवली जाईल आणि योग्य तो आदेश पारित केला जाईल.

आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सोबत नि.क. ०१ ची छायांकित प्रत

**स्वाक्षरित/-**
**दिवाणी न्यायाधीश, व. स्तर. बीड.**

# रोहित पवार यांच्या सरसगट कर्जमुक्ती आंदोलनास किसान संघर्ष समितीचा सक्रिय पाठिंबा - प्रा. सुशीलाताई मोराळे




पंढरपूर /प्रतिनिधी

दिनांक १२ जून पासून पंढरपूर येथे शेतकऱ्यांना सरसगट कर्ज माफ करावे या साठी अन्नदात्यासाठी अन्न सत्याग्रह रोहित पवार यांनी सुरू केले आहे. किसान संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष संयुक्त किसान मोर्चाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. सुनीलम आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी पंढरपूर येथे जाऊन आपला सक्रिय पाठिंबा दिला आहे.

देशाच्या दिल्लीच्या बॉर्डरवर ३८० दिवस शेतकरी विरोधी तीन कायदे रद्द करा या मागणीसाठी किसान संघर्ष समिती आणि संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने आंदोलनात सक्रिय भागीदारी करून सरकारला हे तीन शेतकरी विरोधी कायदे रद्द करायला डॉ. सुनीलम आणि देशातील ३०० शेतकरी संघटनांनी भाग पाडले. या लढ्याचा अनुभव डॉक्टर सुनीलम यांनी पंढरपूर येथील उपोषणस्थळी कथन केला.

खरं म्हणजे ही कर्जमाफी पूर्णपणे फसवी असून शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी आहे. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात या कर्जमाफीची तरतूदच नाही आता पुरवणी मागण्यात तरतूद केली जाणार आहे. लाडकी बहीण, शेती कंपनी विज बिल माफ या मत पेटीवर डोळा ठेवून केलेल्या घोषणामुळे सरकारच्या तिजोरीवर ४५ हजार कोटीचा अतिरिक्त बोजा पडत आहेत.

या कर्जमाफीमुळे राज्य सरकारवर ३६ हजार ५८८ कोटीचा बोजा पडणार आहे. ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार असं सरकार सांगत आहे. २ लाख पर्यंतच कर्ज माफ होणार आहे. १६ लाख ७४ हजार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. ज्याच्याकडे २ लाखापेक्षा जास्त कर्ज आहे त्यांनी वरचे कर्ज भरायला ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत दिली आहे. असे जवळपास २ लाख १० हजार शेतकरी आहेत. जे वरचे कर्ज भरतील त्यांना ५० हजार प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. असे लाभार्थी १२.७१ लाख आहेत.

२०१९ ला केलेल्या कर्जमाफीचा लाभ ज्यांनी घेतला त्यांना २०२६ ची कर्जमुक्ती मिळणार नाही. नैसर्गिक संकटे कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी कधी अवकाळी मुळे, शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही म्हणून कधी नापिकी, निर्यात आयात धरणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. मोदींच्या १२ वर्षात १ लाख २५ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही कर्जमाफी पूर्णपणे फसवी व दिशाभूल करणारी आहे, अटी शर्ती घालून केलेली कर्जमाफी मान्य नाही म्हणून रोहित पवार प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनाचा राष्ट्रीय किसान संघर्ष समितीच्या वतीने डॉक्टर सुनीलम आणि प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे.



# राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांचे स्वागत

लातूर प्रतिनिधी

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरात सोमवारी शाळेच्या पहिल्या दिवशी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते पाठ्यपुस्तके, गणवेश व गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संचालक मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांचा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी सहवास

कोल्हापूर प्रतिनिधी

उन्हाळी सुट्टीनंतर कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद मराठी शाळा आज नव्या उत्साहात सुरू झाल्या. शाळेच्या पहिल्याच दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्यांचे औक्षण, पुष्पवृष्टी आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून जल्लोषात स्वागत करण्यात आले. जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सवामुळे शाळा परिसर आनंद, उत्साह आणि विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने फुलून गेला. गावस्तरीय शाळा व्यवस्थापन समित्या, लोकप्रतिनिधी, पालक, शिक्षक आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी भुदरगड तालुक्यातील नाधवडे विद्यामंदिर येथे विद्यार्थ्यांचे स्वागत करून प्रवेशोत्सवात सहभाग घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सुदृढ आरोग्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. कागल तालुक्यातील पिंपळगाव खुर्दमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या उपस्थितीत प्रवेशोत्सव जल्लोषात पार पडला. सरकारी शाळा म्हणजे सर्वसामान्यांच्या हक्काचे ज्ञानमंदिर' हा संदेश देत नवागतांचे स्वागत आणि नूतन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी करवीर तालुक्यातील वरणगे येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी नियमित शिक्षण, वाचनाची आवड आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचेही वितरण करण्यात आले.

# प्राध्यापकांनी संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज : प्रा. डॉ. महेंद्र शिरसाट

## तुलसी शैक्षणिक समूहात सेवापूर्ती गौरव समारंभ उत्साहात संपन्न




बीड /प्रतिनिधी

प्राध्यापकांनी केवळ वर्गात अध्यापन करण्यापुरते मर्यादित न राहता संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज बनली आहे. संशोधनातूनच नवीन ज्ञानाची निर्मिती होते आणि समाजाच्या प्रगतीला दिशा मिळते, असे मत जेष्ठ प्राध्यापक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्रो. डॉ. महेंद्र शिरसाट यांनी व्यक्त केले.

तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने शनिवार, दि. १३ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रो. डॉ. उत्तम साळवे, प्रो. डॉ. मनोहर शिरसाट, प्रा. अर्जुन राठोड यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. महेंद्र शिरसाट म्हणाले की, जीवनात तत्त्वांशी कधीही तडजोड करू नका, महामानवांचे विचार आचरणात आणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव जपा, आपण ज्या समाजातून घडतो त्या समाजासाठी काहीतरी परत देण्याची भावना प्रत्येकामध्ये असली पाहिजे. असा प्रेरणादायी संदेश देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आई-वडिलांप्रमाणे भूमिका निभावावी, असे ते म्हणाले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. मनोहर शिरसाट म्हणाले की, प्रा. डॉ. महेंद्र शिरसाठ यांनी आयुष्यभर तत्त्वांना कधीही सोडले नाही. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांनी अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक विकासाचे कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ अनेक विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनाही झाला असून ते शिक्षण क्षेत्रातील प्रेरणेचे महत्त्वपूर्ण स्रोत आहेत.

प्रो. डॉ. उत्तम साळवे यांनी आपल्या भाषणात डॉ. शिरसाट यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. देश-विदेशातील अनेक नामांकित पदव्या त्यांनी संपादन केल्या असून त्यांचा परिचयच तब्बल ५५ पानांचा आहे. हे यश मिळवण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट, मेहनत आणि आपले सर्वस्व पणाला लावले आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाज व शिक्षण क्षेत्रासाठी अधिकाधिक योगदान देण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे.

अध्यक्षीय समारोपात प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, डॉ. महेंद्र शिरसाट यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणा, तत्त्वनिष्ठा आणि सामाजिक मूल्ये जपत कार्य केले. त्यांनी कधीही शॉर्टकटचा मार्ग स्वीकारला नाही. महामानवांच्या विचारांना कृतीत उतरवत त्यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण केली. त्यांच्या कार्यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थी घडले असून विद्यापीठाच्या नावलौकिकातही भर पडली आहे, असे नमूद केले.

या गौरव सोहळ्यास तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर वाघमारे यांनी मानले.

## लातूर जिल्ह्यात 'चेक बाऊन्स' प्रकरणांसाठी

# १८ जुलै व २१ नोव्हेंबरला विशेष लोक अदालतीचे आयोजन

लातूर (जिमाका)

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशान्वये लातूर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १८ जुलै २०२६ आणि २१ नोव्हेंबर २०२६ रोजी परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ नुसार दाखल असलेल्या 'चेक बाऊन्स' (धनादेश अनादरीत) प्रकरणांसाठी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या पक्षकारांची तसेच बँक व वित्तीय संस्थांची या कलमानुसारची प्रकरणे सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत, त्या सर्वांनी या विशेष लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

या विशेष लोक अदालतीमध्ये पक्षकारांना आपली बाजू मांडण्यासाठी समान संधी मिळते आणि दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड आपसी संमतीनेच केली जाते. न्यायालयात वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रियेला फाटा देत, येथे एकाच दिवशी आपसी संमतीने प्रकरण निकाली निघत असल्याने पक्षकारांचा मौल्यवान वेळ व पैसा वाचतो, तसेच प्रकरण निकाली निघाल्यावर भरलेले न्यायालयीन शुल्क देखील नियमानुसार परत मिळते. त्यामुळे सर्व संबंधित पक्षकार आणि विधीज्ञांनी आयोजित करण्यात आलेल्या या विशेष लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रकरणे मोठ्या प्रमाणावर आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेतानाच मैदानी खेळांनाही प्राधान्य द्यावे - राज्यपाल जिष्णु देव वर्मा



मुंबई /प्रतिनिधी

शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून व्यक्तिमत्त्व विकास, संस्कार संवर्धन आणि जीवनाला दिशा देणारे केंद्र आहे. आज विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले शिक्षण, मूल्ये आणि संस्कारच उद्याचे जागरूक नागरिक, संवेदनशील व्यक्तिमत्त्व आणि राष्ट्रनिर्माते घडवणार आहेत. शिक्षणाबरोबरच स्वस्थ शरीर आणि स्वस्थ मन जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असून विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेतानाच मैदानी खेळ, योग आणि संगीतालाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.


राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील मुंबई पब्लिक स्कूलमध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' आयोजित करण्यात आला. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, शिक्षण समिती अध्यक्ष राजेश्री शिरवडकर, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शिक्षण) डॉ.अविनाश ढाकणे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती आदी उपस्थित होते.

## धनराज पवार यांचे पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत यश

जामखेड प्रतिनिधी

जामखेड येथील धनराज भगतसिंग पवार यांनी बी.ए. (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम) पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन केल्याबद्दल शहरासह तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रतिकूल परिस्थितीतही जेष्ठांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे सहकार्य आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी बी.ए. एम.सी.जे. परीक्षेत प्रथम श्रेणीत यश संपादन केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आरोग्य, कृषी, तंत्रज्ञान, क्रीडा आणि विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



शिक्षण हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली - धनराज पवार

जिद्द असेल तर मार्ग सापडतो, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि जेष्ठांचे मार्गदर्शन असेल तर यश मिळविता येते. शिक्षण हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे.

# विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने नाव उज्ज्वल करावे - प्राचार्य शोभाताई आंधळे

## नालंदा फाऊंडेशनतर्फे वडवणीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व करिअर मार्गदर्शन सोहळा संपन्न

वडवणी /प्रतिनिधी

आजचा सत्कार सोहळा म्हणजे विद्यार्थ्यांनी घेतलेली अपार मेहनत, केलेले परिश्रम, जिद्द आणि चिकाटी यांच्या जोरावर मिळवलेल्या यशाला मिळालेली कौतुकाची थाप आहे. आपण बुद्धीने कितीही हुशार असलो, तरी योग्य वेळी योग्य दिशा मिळणे अत्यंत गरजेचे असते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना तीच योग्य दिशा देण्याचे काम करत आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यात जिथे कुठे जाल, तिथे आपल्या कर्तृत्वाने स्वतःचे, आपल्या कुटुंबाचे, शाळेचे आणि गावाचे नाव उज्ज्वल करावे, असे प्रेरणादायी प्रतिपादन महारानी ताराबाई उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य शोभाताई आंधळे यांनी केले.

नालंदा फाउंडेशन, बीडच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. हा सोहळा रविवार, दिनांक १४ जून रोजी वडवणी येथील हिंगलाज माता मंदिर परिसरात अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य यशवंत भोसले, प्रा.ओमप्रकाश जाधव, प्रा.अर्जुन राठोड, प्राचार्य भारत मगर तसेच प्रा. विजयकुमार बोचरे, प्राचार्य संतोष मुंडे, प्रा. प्रकाश खळगे, प्रा. दत्ता नागवे, प्राचार्य विनोद लांबुड, प्राचार्य राहुल शिरसाट, प्रा.सौरभ खांडवे, प्रा.रामनाथ डोईफोडे , उपप्राचार्य अशोक मस्के आणि प्रा. विष्णू डोईफोडे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना सांगितले की, आपल्या बीड जिल्ह्यामध्ये अनेक चांगल्या गोष्टी आणि कर्तृत्ववान माणसे आहेत, परंतु दुर्दैवाने आपल्या जिल्ह्यातील या चांगल्या गोष्टी कोणी ठळकपणे सांगत नाही. बीड जिल्ह्याची नकारात्मक ओळख बदलून तिला कर्तृत्वाची ओळख देणे आता तुमच्या हातात आहे. तुमच्या आवडीनुसार तुम्हाला आयुष्यात काय बनायचे आहे, हे तुम्हीच ठरवले पाहिजे. जर तुम्हाला तुमचे आयुष्य खऱ्या अर्थाने बदलायचे असेल, तर केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही; तुम्हाला यशाचा खरा अर्थ कळाला पाहिजे आणि हे जग समजले पाहिजे. त्यासाठी आयुष्यात शिस्त, वेळेचे महत्त्व आणि शिक्षणाचे मर्म जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

या सोहळ्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रेरणादायी पुस्तक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.



या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डी.डी. राऊत, प्राचार्य प्रकाश ढोकणे यांनी केले. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी तुलसी समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला वडवणी परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रल्हादपूर जि.प. शाळेत प्रवेश उत्सव उत्साहात नव्या कोऱ्या गणवेश व पुस्तकांसह चिमुकल्यांचे स्वागत

भोकरदन इसरारखान पठाण :-
नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळेची ओढ लागावी आणि शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा प्रल्हादपूर येथे प्रवेश उत्सव मेळावा अत्यंत दिमाखात आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. पहिल्याच दिवशी शाळेत पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांचे पुष्पगुच्छ आणि गोड खाऊ देऊन जंगी स्वागत करण्यात आले.

पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप

शासनाच्या वतीने मिळणारी मोफत पाठ्यपुस्तके आणि नवीन शालेय गणवेशाचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हातामध्ये नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध आणि अंगावर नवा गणवेश चढवताच चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या




चेहऱ्यावरचा निरागस आनंद ओसंडून वाहत होता.विद्यार्थी हेच देशाचे भविष्य आहेत. त्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शाळा शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. शासनाच्या मोफत पुस्तक व गणवेश योजनेमुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे शक्य होते. प्रल्हादपूरची शाळा गुणवत्तेत नेहमीच अग्रेसर राहील यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. श्री. विष्णू पाटील गाढे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती पालकांचा आणि गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद

या सोहळ्याला प्रल्हादपूर गावातील मान्यवरांनी विशेष उपस्थिती लावली होती. यामध्ये श्री. विष्णू पाटील गाढे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती, श्री. आप्पासाहेब जाधव शालेय शिक्षण तज्ञ, श्री. ताईराम नामदे श्री. विजय नामदे, श्री. संभाजी नामदे यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांची कल्पकता आणि आकर्षक सजावट हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गजानन कुटे सर आणि सहशिक्षक श्री. गणेश बरडे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षकांनी पहिल्या दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण शाळा फुगे, सुंदर रांगोळ्या आणि आकर्षक कमानींनी सजवली होती. या आनंददायी वातावरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये शिक्षणाविषयी एक सकारात्मक ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# पायांचे ठसे, औक्षण अन् पुस्तक-गणवेश वाटपातून नवागतांचे जल्लोषात स्वागत

जामखेड /प्रतिनिधी
अंबड तालुक्यातील जामखेड येथील जिल्हा परिषद प्रशाला पश्चिम शाळेत शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेत प्रथमच प्रवेश करणाऱ्या चिमुकल्यांसाठी विविध स्वागत उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना शाळेत प्रवेश देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची मंगल सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत शालेय पुस्तके व गणवेशाचे वितरण करण्यात आले. पुस्तकांसह आणि गणवेश दिल्याने चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद



सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भागचंद मस्के, ड. मंजीत भोजने, दीपक पांढरे, विलास जाधव ( पत्रकार ), विठ्ठल निलाखे, भगवान भोजने, बळीराम पांढरे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक डॉ. विजय पंजरकर, शिक्षक सतीश चाहूर, प्रमिला सातपुते, ललिता काळे, मनाली वाघचौरे या शिक्षकवृंदाची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक डॉ. विजय पंजरकर यांनी केली. सतीश चाहूर यांनी कार्यक्रमाचे अनुमोदन केले, तर ललिता काळे यांनी आभार प्रदर्शन केले.शाळेच्या पहिल्याच दिवशी आयोजित करण्यात आलेल्या या स्वागत समारंभामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शाळेविषयी आपुलकी निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

# मृग नक्षत्र कोरडे; खरीप पिके दुष्काळाच्या छायेत, बळीराजा चिंतेत!

## दावरवाडी येथील वीरभद्रा नदी पडली कोरडीठक, नदीकाठच्या गावासमोर पाणीटंचाई चे भीषण संकट:

पैठण /प्रतिनिधी
दावरवाडी पैठण येथील वीरभद्रा नदी मागील दोन ते तीन महिन्यांपासून खळखळत वाहत होती. त्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करत होते. परंतु एप्रिल महिना लागताच तीव्र तापमानात वाढ होऊन आणि शेतीला लागणार्या पाण्याच्या वापर वाढल्याने नदीतील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खालावत गेली. आज रोजी नदी पुर्णपणे कोरडी ठाक पडल्याने नदीकाठी असलेल्या गावांसह शेतीला मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. नदीकाठच्या गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट गडद होत चालले आहे.

गतवर्षी पैठण तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला होता, त्यामुळे नदी, नाले, तलाव ओढे, बंधारे पुर्णपणे भरले होते. त्यामुळे शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचा आविर्भात नागरीकांनी समाधान व्यक्त केले होते. परंतु एप्रिल महिना लागताच कडाक्याचे जीव घेणे उन्ह पडायला सुरुवात झाली. त्यात शेती पिकांसह पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लाग लागल्याने नदीतील पाण्याची पातळी आपोआप



खालावत गेली. आज रोजी नदी पुर्णपणे कोरडीठक पडल्याचे दिसून येत आहे. नदी पुर्णपणे कोरडी पडल्याने नागरिक, शेतकरी आणि पशुधनासमोर गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

त्यामुळे नदीकाठच्या वाड्या-वस्तावर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनांचे स्त्रोतही अडचणीत आल्याने आगामी काळात नदीकाठच्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. पाण्याअभावी शेतीवरही मोठ्या परिणाम होण्याची शक्यता आहे. या परिसरात ऊस, मोसंबी, डाळिंब, या सारखे पिके प्रमुख असुन पाणी उपलब्द झाले नाही तर या पिकांच्या उत्पादनात मोठी घट होऊ शकते. आधीच गतवर्षी पडलेल्या अतिवृष्टीच्या पावसाने मोठा फटका शेतकऱ्यांना बसला असुन, आता दुष्काळदृश्य परिस्थिती उभी टाक ली आहे. दरम्यान नदीपात्र कोरडे पडल्याने अवैध वाळू, उपशालाही वेग आला आहे. नदीपात्रातील वाळुचे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू असुन, त्यावर प्रभावी महसूल विभागाचे नियंत्रण नसल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनकडुन होत आहे. एकंदरीत नदीकाठच्या गावांमधील परीस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असुन प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नदीत पाणी उपलब्द करून देण्याची मागणी नागरिक व शेतकरीवर्गातुन होत आहे..

# स्मार्ट मीटरच्या नावाखाली जनतेची आर्थिक लूट थांबवा!

## आमदार जयंत पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र गोव्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही स्मार्ट मीटर प्रकल्पाला स्थगिती देण्याची मागणी

भोकरदन इसरारखान पठाण :- महावितरणमार्फत राबवण्यात येत असलेल्या स्मार्ट मीटर प्रकल्पामुळे सर्वसामान्य नागरिक, व्यापारी आणि घरगुती ग्राहक प्रचंड आर्थिक संकटात सापडले असून वाढीव वीजबिले आणि मागील कालावधीचा अवाढव्य दंड आकारला जात असल्याने जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर विधानसभा सदस्य जयंत कुसुम राजाराम पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

गोवाप्रमाणे महाराष्ट्रातही ब्रेक लावा

दि. १५/०६/२०२६ रोजी दिलेल्या पत्रात जयंत पाटील यांनी म्हटले आहे की, शेजारील गोवा राज्यात मुख्यमंत्री प्रमोद



सावंत यांनी जनहितार्थ स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेला तात्पुरता 'ब्रेक' लावला आहे, तसेच वाढीव बिलांची आणि अन्यायी दंडाची प्रकरणनिहाय तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. पुरोगामी आणि संवेदनशील महाराष्ट्रातही अशाच पद्धतीचा दिलासादायक निर्णय घेण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे.

अचानक वाढीव बिले, अन्यायकारक दंड

पत्रात त्यांनी गंभीर बाबी निदर्शनास आणल्या आहेत:

जुन्या मीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसवल्यापासून ग्राहकांना अचानक त्यांच्या आर्थिक क्षमतेच्या बाहेरची प्रचंड वाढीव बिले येत आहेत.

अनेक ग्राहकांनी घर बांधताना मंजूर करून घेतलेल्या वीजभारापेक्षा सध्याचा प्रत्यक्ष वापर जास्त असल्याचे सांगून, त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता मागील कालावधीचा अवाढव्य दंड आकारला जात आहे.

वर्षानुवर्षे जुनी मीटर बंद किंवा संथ गतीने चालत होती, ही वीज खात्याची चूक व प्रशासकीय दुर्लक्ष असताना त्याचा संपूर्ण आर्थिक भार एकाच वेळी दंडाच्या स्वरूपात सर्वसामान्य ग्राहकांवर टाकणे अत्यंत अन्यायकारक आहे.

राज्यातील जनतेची आर्थिक लूट थांबवण्यासाठी स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रकल्पाला तात्काळ स्थगिती देण्यात यावी.

आतापर्यंत आलेल्या सर्व वाढीव बिलांची आणि अतिरिक्त लोडच्या दंडाची प्रकरणनिहाय स्वतंत्र पडताळणी करण्यात यावी.

ही पडताळणी पूर्ण होईपर्यंत ग्राहकांवर झालेली अन्यायकारक दंड आकारणी रद्द करण्यात यावी.

कोणत्याही ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित केला जाऊ नये* व मंजूर वीजभार वाढवून घेण्यासाठी पुरेशी पूर्वसूचना व मुदत देण्यात यावी.

जयंत पाटील यांनी पत्रात नमूद केले की, यामुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेबद्दल आणि त्याच्या बिलिंग पद्धतीबाबत लोकांच्या मनात मोठी शंका निर्माण झाली असून राज्यातील अनेक भागात तीव्र निदर्शने आणि आंदोलने सुरू झाली



## निधन वार्ता दावरवाडी प्रतिनिधी

द्वारकाबाई आसाराम तांगडे वय ८६) अल्पशा आजाराने सकाळी ८:०० वाजता निधन झाले त्यांच्या पश्चात तीन मुले व दोन मुली नातवंडे असा मोठा परिवार त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सायंकाळी पाच वाजता दावरवाडी येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

शोकाकुल -शिवनाथ आसाराम तांगडे (मुलगा) अरविंद आसाराम तांगडे (मुलगा)

चंद्रकांत आसाराम तांगडे (मुलगा) सौ मंदाबाई खोसरे (मुलगी) सौ.सुनिता विजय ओटे (मुलगी)

तांगडे परिवार दावरवाडी

# आयुष्यात चांगले यश मिळवून आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करा माजी मंत्री अर्जुनराव खोतकर

## शांतिनिकेतन विद्यामंदिरात प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न विद्यार्थ्यांवर झाली पुष्पवृष्टी

जालना शेख फारुक :-
आजच्या आधुनिक काळात विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा सहज उपलब्ध होत आहेत. या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करावेत आणि आयुष्यात मोठे यश संपादन करून आपल्या शाळेचे व आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी केले.

जालना शहरातील संभाजीनगर प्रभागातील नामांकित शांतिनिकेतन विद्यामंदिर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, माजी जि.प.अध्यक्ष पंडितराव भुतेकर,नगरसेवक तथा संस्थेचे संचालक अश्विन अंबेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.नवागतांचे अनोख्या पद्धतीने स्वागत व पुस्तकांचे वितरण शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या चिमुरड्यांचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर आणि संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून व हस्तांदोलन हँडशेक करून अत्यंत अनोख्या व लाघवी पद्धतीने स्वागत केले. त्यामुळे पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून आला. याप्रसंगी शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पूर्वी शिक्षण खडतर होते आज दारापर्यंत आले अर्जुनराव खोतकर पुढे बोलताना अर्जुनराव खोतकर म्हणाले की

शांतिनिकेतन शाळा ही शहरातील एक दर्जेदार संस्था आहे.अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी अत्यंत मेहनतीने ही संस्था उभी केली असून ते सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्नशील असतात. पूर्वी ग्रामीण भागात शिक्षणाच्या सोयी नव्हत्या विद्यार्थ्यांना शहरात येऊन स्वतः स्वयंपाक करून खडतर परिस्थितीत शिकावे लागत होते. पण आज काळ बदलला असून शिक्षण तुमच्या दारापर्यंत पोहोचले आहे. आजच्या युगात चांगल्या शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले आणि माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम या महापुरुषांचा आदर्श समोर ठेवून आपले ध्येय साध्य करावे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आम्ही कटीबद्ध भास्करराव अंबेकर संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी आपल्या मनोगतात पालकांचे आभार मानले. ते म्हणाले शांतिनिकेतनच्या माध्यमातून जालना शहर व परिसरातील अत्यंत सामान्य नागरिकांच्या पाल्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. पालकांनी संस्थेवर जो विश्वास टाकला आहे तो आम्ही कधीही



ढळू देणार नाही आणि कामात जराही कसूर करणार नाही.

शिक्षक व कर्मचाऱ्यांचे परिश्रम

या सोहळ्याला विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, प्रेमला पंडित, सूर्यकांत बेले, अशोक माधवले, मोहन भदाडे, संजय खरात, पांडुरंग वाजे, शिवहरी मांटे, सुनिता खरात, अमोल पवार, गजानन दळवी, अर्चना भालेराव, पल्लवी खरात, सुनील जाधव, पुरुषोत्तम चौरे, कीर्ती खैरे, अनिता जाधव, अंबादास घायाळ, रमेश गाढवे, सीमा इंगळे, कांचन वाघ, अरुणा मांटे, संदीप वाखारकर, रामकिसन मोहिते, स्वाती काकडे, विद्या चौधरी, उद्धव वाघ, सुमित्रा शर्मा, गायत्री सूर्यवंशी, किशोर शेळके, नितीन पंडित, कल्याणी काळे, वसंत गाडेकर व तुकाराम चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# रोटरी क्लब गेवराईतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

गेवराई (प्रतिनिधी)
सध्या बीड जिल्ह्यात रक्ताचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. रक्तदान केल्याने सर्वश्रेष्ठ दान होते. या गोष्टीची जाणीव ठेवून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने रोटरी क्लब ऑफ गेवराई ,तिरुपती हॉस्पिटल व तिरुपती ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १५ जून २०२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . १५ जून हा जगभर रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. यापूर्वीही गुरुनानक जयंती उत्सवानिमित्त रोटरी क्लबने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सध्या रक्ताचा तुटवडा वाढला असून रक्तदान शिबिर घेणे आवश्यक झाले आहे. म्हणूनच गेवराई बस स्थानकाजवळील डॉ. गोविंद लेंडगुळे यांच्या तिरुपती हॉस्पिटलमध्ये १५ जून रोजी सकाळी १०.३० वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट डायरेक्टर तथा रोटरी क्लब बीडचे माजी अध्यक्ष मेघराज पिंगळे तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लब बीडचे अध्यक्ष विकास उमापूरकर आणि दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे यांच्या अध्यक्षतेखाली रक्तदान शिबिराचे उद्घाटन होणार आहे. गेवराई शहरात होणाऱ्या या रक्तदान शिबिरात सर्व व्यापारी, शिक्षक ,नागरिक बंधू आणि भगिनी यांना रक्तदान शिबिरात सहभागी होण्याची आवाहन रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे, सचिव प्रवीण जैन, उपाध्यक्ष सुदाम धुपे ,सहसचिव डॉ नागनाथ मोटे ,प्रोजेक्ट चेअरमन डॉ. विजय सिकची, डॉ. गोविंद लेंडगुळे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे आ.सुरेश धस यांनी घेतले बडे बाबांच्या समाधीचे दर्शन



विकासकामांची केली पाहणी

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) सोमवती अमावस्येच्या पावन पर्वाचे औचित्य साधत आमदार सुरेश धस यांनी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे भेट देऊन बडे बाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या समाधीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी त्यांनी समाधीस्थळी नतमस्तक होत राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

सोमवती अमावस्या हा धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. या पार्श्वभूमीवर आ. सुरेश धस यांनी गडावरील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा केली. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामांचा त्यांनी आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या. गड परिसरातील पायाभूत सुविधा, भाविकांसाठी निवास, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंतर्गत रस्ते तसेच परिसर सुशोभीकरण यांसारख्या विविध कामांच्या प्रगतीची माहिती त्यांनी घेतली. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने येथे येणाऱ्या भक्तांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी विकासकामे गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

यावेळी उपस्थित भाविकांशीही त्यांनी संवाद साधत त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेतल्या. धार्मिक स्थळांचा विकास हा केवळ भौतिक सुविधांपुरता मर्यादित नसून श्रद्धा, संस्कृती आणि परंपरा जपण्याचे कार्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आ. सुरेश धस म्हणाले, श्री मच्छिंद्रनाथ महाराजांचे हे पवित्र स्थान अनेक भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला समाधानकारक सुविधा मिळाव्यात, तसेच या क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील. बडे बाबांच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद नांदो, हीच प्रार्थना.

# अंबाजोगाईत प्रभारी मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला घातला हार; लोकविकास महाआघाडीतर्फे तीव्र निषेध!

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी (उज) हे वारंवार कार्यालयात गैरहजर राहत असल्याच्या निषेधार्थ लोकविकास महाआघाडीच्या नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून अनोखे आंदोलन केले. या आंदोलनातून प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

लोकविकास महाआघाडीच्या नगरसेवकांनी सांगितले की, मुख्याधिकाऱ्यांच्या सततच्या गैरहजेरीमुळे शहरातील विकासकामे आणि विविध प्रशासकीय प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत.

नागरिकांच्या समस्या आणि प्रभागातील विविध प्रश्न घेऊन नगरपालिकेत गेल्यानंतर संबंधित अधिकारी जागेवर उपलब्ध नसल्याने जनतेची कामे रखडत आहेत. अनेक फाईल्स मंजुरीअभावी प्रलंबित राहिल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याच पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदवला.

हे आंदोलन प्रशासनाच्या बेजबाबदार आणि निष्क्रिय कारभाराविरोधातील प्रतीकात्मक आंदोलन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि



नियमितपणे कार्यालयात उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे शहराच्या विकासाला खीळ बसत आहे. मुख्याधिकारी नियमितपणे कार्यालयात हजर राहून नागरिकांच्या आणि शहराच्या कामांना न्याय देईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, असा इशारा लोकविकास महाआघाडीच्या नगरसेवकांनी दिला.

यावेळी उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया,नगरसेवक तथा गटनेते सय्यद ताहेरभाई,लोकविकास महाआघाडी चे उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया, गट नेते ताहेर भाई, ऍडओकेट विकास जी काकडे (नियोजन आणि विकास समिती),पाणी पुरवठा सभापती च्या वतीने भीमसेन अप्पा लोमटे, नजीर पठाण बांधकाम सभापती स्वतः,महेशकाका लोमटे, महेशजी कदम नगरसेवक,राजपाल जावळे स्थायी समिती सदस्य, आकाश कराड नगरसेवक,रौफ भाई, अकबर भाई पठाण, सचिन विलास जाधव, शेख अश्फाक भाई हे उपस्थित होते.



# संत महंत यांच्या उपस्थितीत साजरा झाला दगडूभाऊ दळवे यांचा वाढदिवस साजरा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील कर्मवीर शिक्षण संस्थेचे संचालक,भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दगडु भाऊ दळवे यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला, शैक्षणिक,राजकीय, सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर,सर्वांच्या सुख दुःखात नेहमी सहभाग असलेले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून यांची ओळख आहे वाढदिवसाचे तसेच अधिक मासाचे औचित्य साधून केज परिसरातील अनेक महाराज मंडळी च्या उपस्थितीत त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री श्रीकृष्णाश्रम केज,वै. श्रीधर नाना यांचे सुपुत्र ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पिंपरीकर व त्यांचा परीवार,ह.भ.प. विष्णू महाराज शास्त्री, ह.भ.प.सुनिल महाराज गालफाडे,ह.भ.प.सौ. शारदाताई गालफाडे श्रीविठ्ठल जनाई वारकरी शिक्षण संस्था चिंचोली माळी,श्रीक्षेत्र उत्तरेश्वर मंदिर पुजारी,ह.भ.प. भाऊसाहेब मोकाशी सपत्नीक,ह.भ.प. संभाजी महाराज कदम, ह.भ.प.संजय महाराज नखाते,ह.भ.प.आबा महाराज मेहरकर, ह.भ.प.रवी महाराज गायकवाड,ह.भ.प.पंढरीनाथ काळे,तसेच दिलीप गायकवाड सर, राजाभाऊ भुजबळ, राजाभाऊ नखाते, मोहनराव बर्डे इत्यादी मित्र मंडळी देखील उपस्थित होती.वाढदिवसानिमित्त राजकीय सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# बालाघाट प्रतिष्ठान च्या रक्तदान शिबीरास उस्फुर्त प्रतिसाद १८२ रक्तदान

## रक्तदात्याना सोडत पध्दतीने करणार सायकलचे वाटप उपक्रमातून इंधन बचत पर्यावरण जागृतीचा संदेश

किल्ले धारूर/वार्ताहर

धारूर येथील बालाघाट प्रतिष्ठान यांच्या वतीने जागतिक रक्तदान दिन तसेच स्व. कॅ. राजपालसिंह हजारी भैय्या यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मागील २९ वर्षांपासून सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षीही मोठ्या उत्साहात रक्तदान शिबीर संपन्न झाले. या शिबीरात १८२ रक्तदात्यानी रक्तदान केले रक्तदात्याना सोडत पध्दतीने २५+ सायकलचे वितरण रक्तदाते व मान्यवर यांना बोलावून लवकरच ड्रॉ पद्धतीने करण्यात येणार आहे इंधन बचतीचा व पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यात यावेळी येणार आहे. असे प्रतिपादन प्रतिष्ठाणचे अध्यक्ष आणी कार्यक्रमाचे संयोजक डॉ स्वरूपसिंह हजारी यांनी प्रस्ताविकात संगीतले

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी धारूर नगरपरिषद चे नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव, हे होते तर प्रमुख उपस्थीती मध्ये पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे, माजलगाव मतदार संघाचे भाजपा नेते माधवतात्या निर्मळ माजी नगराध्यक्ष शेषेराव फावडे, उद्योजक उदयसिंह दिख्खत ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील शिनगारे उपनगराध्यक्ष प्रतिनिधी सय्यद शाकेर इको बटालियन चे कृष्णा जाधव माजी नगराध्यक्ष उत्तमलाल तोष्णीवाल सह नगरपरिषदेचे गट नेते नगरसेवक गावातील प्रतिष्ठित नागरिक पत्रकार वकील बांधव सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली सुरुवातीला उपस्थितांच्या हस्ते स्व. कॅ राजपालसिंह हजारी भैय्या, व स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष बालाघाट प्रतिष्ठान चे अध्यक्ष सय़ोजक डॉ स्वरूपसिंह हजारी यांनी केले. त्यानी उपक्रमा विषयी सविस्तर माहीती सांगीतली सातत्याने २९ वर्ष विक्रमी रक्तदानाचे सातत्य राखल्याचे सांगीतले या वर्षी रक्तदात्याना प्रोत्साहन देण्या साठी २५+ सायकलचे वितरण ड्रा पध्दतीने मान्यवर व रक्तदात्याचे उपस्थीत काढून इंधन बचत व पर्यावरण रक्षणाचा संदेश देणार असल्याचे डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी साग़ीतले तसेच पुढचा वर्षी नवीन सामाजिक नवीन उपक्रम राबऊ असे कार्यक्रम प्रसंगी उपस्थि सर्व ना सांगण्यात आले

तसेच यावेळी नगराध्यक्ष




बालासाहेब जाधव , माधव तात्या निर्मळ, शेषेराव फावडे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रक्तदान हेच श्रेष्ठदान हा संदेश देत अनेक युवकांनी प्रथमच रक्तदान केले. या शिबीरात ---- १८२ रक्तदात्यानी रक्तदान केले

बालाघाट प्रतिष्ठानने गेल्या २९ वर्षांची परंपरा कायम राखत दरवर्षी विक्रमी रक्तसंकलनाचा मान मिळविला आहे. यावर्षीही मोठ्या प्रमाणात रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला.पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी २५+ पेक्षा अधिक वेळा रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा ड्रा पध्दतीने सायकल भेट देऊन विशेष सन्मान करण्यात येणार आहे तसेच रक्तदात्यांना प्रोत्साहनपर भेट म्हणून सायकल लकी ड्रॉ पद्धतीने देण्यात येणार असल्याची माहिती भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी सह आयोजकांनी दिली.रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळत असल्याने समाजातील अधिकाधिक नागरिकांनी या पवित्र कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड मोहन भोसले यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाघाट प्रतिष्ठानचे सह पदाधिकारी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले

# अंबाजोगाईत कंत्राटदाराविरुद्धच्या कथित खोट्या तक्रारीविरोधात गावकऱ्यांचे पोलिसांना निवेदन; कारवाईची मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका नामांकित व्यवसायिकाविरुद्ध कथित स्वरूपात खोटी तक्रार दाखल करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शेपवाडी गावातील ग्रामस्थांनी एकत्रित येत अंबाजोगाई शहर पोलीस निरीक्षकांची भेट घेतली आणि संबधित तक्रारदारांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.



पोलिसांना दिलेल्या लेखी निवेदनानुसार, शेपवाडी येथील रहिवासी रेखा उत्तम वंजारे आणि गोविंद रामभाऊ शेप यांनी गावातील प्रतिष्ठित कंत्राटदार चांगदेव पाटलोबा शेप यांच्याविरुद्ध १४ एप्रिल २०२६ रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात एक तक्रार दाखल केली होती. मात्र, ही तक्रार पूर्णपणे खोटी आणि पूर्वनियोजित कट रचून करण्यात आली असल्याचा दावा गावकऱ्यांनी केला आहे. चांगदेव शेप हे गेल्या १० वर्षांपासून एका नामांकित कन्स्ट्रक्शन कंपनीसोबत यशस्वीरित्या कंत्राटी व्यवसाय करत असून ते अत्यंत प्रतिष्ठित नागरिक आहेत.ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८:३० ते १०:१५ या वेळेत स्वतः चांगदेव शेप यांच्या घरासमोर अनेक गावकरी एकत्र बसून गप्पा मारत होते. या संपूर्ण कालावधीत तक्रार अर्जात नमूद केलेली कोणतीही आक्षेपार्ह घटना त्या ठिकाणी घडलीच नाही. केवळ वैयक्तिक आकसापोटी आणि संगनमत करून हा खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.तसेच संबधित संशयित व्यक्ती गावातील लोकांना विनाकारण त्रास देत असून, त्यांना खोट्या अॅट्रॉसिटीच्या गुन्ह्यांत अडकवण्याची धमकी देत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. या निवेदनावर योगेश मुंडे, दिपक शेप, मच्छिंद्र तरडे यांच्यासह ३२ हून अधिक प्रमुख ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून खोट्या तक्रारी करणाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी,

# डॉ.आशा फड यांच्या साहित्यात निष्ठा,समर्पण आणि त्याग ही मूल्ये-प्रो.डॉ.मुरलीधर लहाडे

संवेदनशील मनाने शोधक वृत्तीने शब्दबद्ध करणाऱ्या लेखिका

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. साहित्याच्या विविध प्रकारातून किंबहुना हे विविध पद्धतीने व्यक्त होत असते. हिंदी साहित्य क्षेत्रातील मेहनती, आणि गुणवान साहित्यिक डॉ.आशा फड या शिस्त निष्ठा समर्थन आणि त्याग ही मूल्य जपणार्यि आहेत!अशा शब्दात हिंदी भाषा साहित्यिक तथा जनविकास वरिष्ठ महाविद्यालयाचे अधिव्याख्याता, विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. मुरलीधर लहाडे यांनी आज येथे कौतुक केले.



पूजा प्रकाशन, कानपूर निर्मित प्रभा खेतान के उपन्यासों मे चित्रित नारी या पुस्तकाच्या अवलोकना दरम्यान समीक्षणा नंतर आपल्या प्रतिक्रिया देताना प्रोफेसर मुरलीधर लहाडे यांनी डॉ. आशा फड यांचे कौतुक केले.

या पुस्तकात डॉ. आशा फड यांनी राष्ट्रीय स्तरावरील हिंदी भाषेच्या ज्येष्ठ साहित्यिका प्रभा खेतान जी यांच्या मौलिक कादंबरी साहित्य प्रकारावर उपन्यास पर लेखन केले आहे. स्त्रियांच्या वेदना, समस्या, अंतर्मनाच्या भावना या अनुषंगाने अत्यंत वास्तव आणि विदारक चित्र मांडले आहे. समाजासमोर हे दुःख मांडून त्यावर व्यवस्था काम करेल. अशी अपेक्षाही त्यांनी यातून व्यक्त केली आहे. हे लेखन अत्यंत मौलिक, चिंतनशील व समतोल दृष्टीचे असल्याचे डॉ.प्रोफेसर मुरलीधर लहाडे म्हणाले.

दुनिया का ऐसा एक भी कोना नही है, जहां पर नारियों के आसु नही गिरे..!

डॉ.आशा फड यांनी डॉ. प्रभा खेतान जी यांच्या आओ पे पे घर चले या कादंबरीचा संदर्भ घेत त्यातील नायीका पात्र आयलीन स्त्रियांचे दुःख पाहून अत्यंत संवेदनशील म्हणते, जगाचा असा एकही कोणा शिल्लक नसेल, की जिथे स्त्रियांचे अश्रू पडले नसतील! यावरून स्त्रियांच्या दुःखाची व्यापकता उजागर होते. हे पुस्तकातून डॉ.आशा फड यांनी अधोरेखित केले, ही त्यांची अत्यंत सूक्ष्म निरीक्षण दृष्टी स्पष्ट होते असे हिंदी भाषा अभ्यासक प्रो. डॉ.घोडके यांनी नमूद केले.

# लोकनेते स्व.बाबुरावजी आडसकर महाविद्यालया चे प्राचार्य डॉ.माधव फावडे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आज आयोजन

केज/प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था,आडस संचलित लोकनेते स्व. बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज येथील प्राचार्य डॉ. फावडे माधव ग्यानोबा हे तब्बल ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त होत आहेत.त्यांच्या या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेच्या गौरवार्थ आज, मंगळवार दि.१६ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ११-३० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य 'सेवापूर्ती सोहळा' आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव मा.श्री.रमेशराव जी आडसकर साहेब यांची लाभणार आहे.

डॉ.माधव फावडे यांनी आपल्या ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळात शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी घडले आहेत.त्यांच्या याच कृतज्ञतेपोटी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळयास जिल्ह्यातील शैक्षणिक,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह आजी- माजी विद्यार्थी,प्राध्यापक



व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन डॉ. फावडे माधव ग्यानोबा व परिवार,तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# धारूर तालुक्यात शाळांच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सवाचा उत्साह; ८,१५० विद्यार्थ्यांचे स्वागत

प्रतिनिधी ।धारूर

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद व इतर शाळांमध्ये सोमवारी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यातील १२८ शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे जल्लोषपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळांच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले असून शाळा परिसरात आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात तालुक्यात सुमारे ८ हजार १५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रवेशोत्सवानिमित्त अनेक शाळांमध्ये नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे



पुष्पगुच्छ, फुले, टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, भेटवस्तू देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला.

शाळांच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. नवीन पुस्तके हातात मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत नियमित उपस्थिती, अभ्यासातील सातत्य आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

तालुक्यातील विविध शाळांमध्ये ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सदस्य , सरपंच आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आत्मीयता निर्माण होऊन शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार झाले.

प्रवेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गटविकास अधिकारी यांनीही काही शाळांना भेटी देऊन व्यवस्थेची पाहणी केली. विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके मिळत आहेत का, शाळांमधील मूलभूत सुविधा, स्वच्छता तसेच शैक्षणिक तयारीची माहिती त्यांनी घेतली. शिक्षकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी केंद्रप्रमुख यांनी भेटी देत मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रवेशोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. शाळांच्या सजावटीपासून विद्यार्थ्यांच्या स्वागतापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले. अनेक शाळांमध्ये आकर्षक रांगोळ्या, फलक आणि स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांचा उत्साह पाहता धारूर तालुक्यातील प्रवेशोत्सवाने शिक्षणाबाबत सकारात्मक संदेश दिल्याचे चित्र दिसून आले. विद्यार्थ्यांनीही नवीन उमेद आणि उत्साहाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली

# आष्टी तालुक्यातील पाणीटंचाईवर आ.सुरेश धस यांचा सविस्तर आढावा

## टंचाईग्रस्त गावांना तातडीने पाणीपुरवठ्याच्या सूचना

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यात निर्माण होऊ घातलेल्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेत तालुक्यातील पाणीस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी गावनिहाय उपलब्ध पाणीसाठा, आरक्षित पाणीसाठ्याची स्थिती तसेच ग्रामीण भागातील टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अलनिनोच्या प्रभावामुळे शेतकऱ्यांनी पेरणीबाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने आष्टी तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजनांचे नियोजन



करण्यात आले. काही गावांसाठी पाणी टँकर मंजूर करण्यात आले असून, उर्वरित गरजू गावांनाही वेळेत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीत मेहकरी, कडा, कडी आणि कांबळी या प्रकल्पांमध्ये आरक्षित पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती संबंधित विभागांकडून देण्यात आली. या प्रकल्पांमधून टंचाईग्रस्त गावांचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना आमदार धस यांनी केल्या. तसेच पावसाचा विलंब झाल्यास आणि पाणीटंचाईची तीव्रता वाढल्यास परिस्थितीनुसार तातडीच्या उपाययोजना राबविण्याबाबतही चर्चा झाली.

या बैठकीस तालुका महसूल व दंडाधिकारी सौ. वैशाली पाटील, महावितरणचे उपअभियंता श्री. देशमुख, जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी श्री. सिनारे, पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अधिकारी श्री. सदगर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आगामी काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाने सतर्क राहून समन्वयाने काम करण्याचे निर्देश आमदार सुरेश धस यांनी यावेळी दिले.



आष्टी - राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक श्री.राजेंद्र लाड सर यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देतांना मान्यवर दिसत आहेत.

# आयुष्यमान आरोग्य मंदिर सारणी (आ) येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

## ग्रामपंचायत व आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमानाने शिबिर संपन्न



केज/प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य केंद्र, युसूफवडगाव अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिर,सारणी(आ) व ग्रामपंचायत सारणी (आ) यांच्या संयुक्त विद्यमानाने छउऊ(असंसर्गजन्य रोग) कॅम्प आयोजित करण्यात आला होता.या शिबिरा मध्ये करण्यात आलेल्या तपासण्यमध्ये रक्तदाब, मधुमेह/रक्तातील साखर तपासणी,कर्करोग तपासणी,ईसीजी तपासणी,हिमोग्लोबीन सह सर्व आजारांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.हे शिबीरआयोजित करण्यासाठी केज तालुका आरोग्य अधिकारी डॉ.लोमटे सर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सारूक सर,डॉ.नागरे मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली हे शिबीर सारणी (आ) येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ.कृष्णा सुर्यवंशी,आरोग्य सेवक आनंद घोडके,लॅब टेक्निशियन प्रितम बचुटे, आरोग्य सेविका रंजना दोडतले,आशाताई रोहिणी खरात,वनमाला सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जयवंती नदी स्वच्छतेला वेग; अंबाजोगाईत पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरु

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

युवा नेते अक्षय मुंदडांनी केली प्रत्यक्ष पाहणी अंबाजोगाई शहरात आगामी पावसाळा लक्षात घेता स्वच्छता आणि पाण्याचा निचरा सुरळीत ठेवण्यासाठी नगरपरिषदेने व्यापक स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते अक्षय मुंदडा यांनी विविध भागांत सुरू असलेल्या स्वच्छता कामांची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पावसाळ्यात निर्माण होणारी पूरसदृष्य परिस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे.

शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या जयवंती नदीपात्रात वर्षभर साचलेला कचरा, प्लास्टिक, गाळ आणि इतर घाण जेसीबीच्या साहाय्याने काढण्याचे काम सध्या अत्यंत वेगाने सुरू आहे. पावसाळ्यात नदी व नाल्यांमध्ये कचरा साचल्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळीत होऊन अनेक सखल भागांमध्ये पाणी तुंबण्याच्या घटना घडतात. ही संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी यंदा नगरपरिषदेने पावसाळ्यापूर्वीच विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

जयवंती नदीसह शहरातील प्रमुख नाले, पाण्याच्या वाहिन्या आणि सार्वजनिक ठिकाणांची साफसफाई करण्यात येत आहे. अक्षय मुंदडा यांनी या कामांचा आढावा घेताना कामांची गुणवत्ता आणि गती यावर विशेष भर देत संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांना वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या पाहणी दौऱ्यात नगरसेवक संजय गंभीरे, महेश आंबाड, माजी नगरसेवक संतोष शिनगारे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत धायगुडे, अमोल पवार, राम घोडके, बिभीषण भालेकर आणि स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब थोरात उपस्थित होते.

दरम्यान, अक्षय मुंदडा यांनी सर्व्हे क्रमांक १७ येथे उभारण्यात आलेल्या मोकाट कुत्र्यांच्या शेल्टर हाऊसलाही भेट दिली. शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी उभारण्यात आलेल्या या केंद्रातील सुविधा, व्यवस्थापन आणि आवश्यक सुधारणांबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. नदी, नाले आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता नागरिकांनी घंटा गाड्यांचा वापर करावा आणि शहर स्वच्छतेसाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगरपरिषदेने केले आहे.

स्वच्छ अंबाजोगाई, सुरक्षित अंबाजोगाई

पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, पाणी तुंबण्याच्या समस्या निर्माण होऊ नयेत आणि शहरातील स्वच्छता अबाधित राहावी यासाठी नगरपरिषदेची स्वच्छता मोहीम आगामी काळात आणखी व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.
- नंदकिशोर मुंदडा (नगराध्यक्ष अंबाजोगाई)

# प्रलंबित मागण्यांबाबत शासन प्रशासनाची टोलवाटोलवी आरटीओ कर्मचाऱ्यांचा एल्गार

## दि १६जून पासून राज्यात आरटीओ सेवा. ठप्प

अंबाजोगाई- प्रतिनिधी

आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षे झाली तरी सेवा प्रवेश नियम तयार नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नती पासून वंचित ठेवले जात असून त्यांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे. असे अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्यास शासन प्रशासन टाळाटाळ करत असल्याची संतप्त भावना राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांमध्ये आहेत. त्यामुळे मंगळावर दिनांक १६ जूनपासून आरटीओ कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा एल्गार केला आहे.

कर्मचाऱ्यांच्या बहुतांशी मागण्या प्रशासन स्तरावर सुटू शकतात. त्यासाठी संघटनेने सप्रमाण पाठपुरावा केला असला तरी मार्गदर्शनाच्या नावाखाली या मागणीबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठवून प्रशासन वेळ खाऊ धोरण राबवीत आहे, असा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेने दिलेल्या आंदोलनाच्या नोटीसनंतर परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक यांनी दहा दिवसांपूर्वी बैठक बोलावली होती. पण त्याचे इतिवृत देण्यासही टाळाटाळ केली जात आहे. प्रशासनाचा हलगर्जीपणा चालढकलपणा त्यातून स्पष्ट होत आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे राज्यातील सर्व आरटीओ कर्मचारी प्रचंड संतप्त झालेले आहेत.

या सर्व बाबींचा विचार करून संपाविषयीचा अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवार दिनांक १३ रोजी झालेल्या संघटनेच्या तातडीच्या बैठकीमध्ये सखोल चर्चा झाली. तेव्हा बेमुदत संपाशिवाय पर्याय नाही अशा तीव्र भावना सर्व पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. त्यानुसार दिनांक १६ जून पासून संपूर्ण राज्यामध्ये आरटीओ कर्मचारी संपावर जाऊन आपला रोष व्यक्त करणार आहेत. त्यामुळे मंगळावर पासून राज्यभरात आरटीओ कार्यालये ठप्प होणार आहेत.

शासन प्रशासनाने प्रलंबित मागण्यांबाबत त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावेत. अन्यथा कर्मचारी आता माघार घेणार नाहीत, अशी ठाम भूमिका संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी व्यक्त केली आहे.

सुरेंद्र सरतापे

सरचिटणीस यांनी कळविले आहे.

# जेष्ठ पत्रकार श्री.सतीश केजकर यांच्या वयाची साठी तर पत्रकारीतेची चौतीस वर्षे

## १६ जुन रोजी पुर्णत्वास

केज/प्रतिनिधी

केज येथील ज्येष्ठ पत्रकार श्री.सतीश व्यंकटराव केजकर यांना वयाची साठ वर्ष पूर्ण झाली.तर पत्रकारितेत ३४ वर्षाचा पण प्रवास त्यांनी पूर्ण केला.त्यांनी वयाचे अर्धे वर्ष हे पत्रकारिता क्षेत्रात काम केले त्यांनी अनेक चढउतार या पत्रकारितेत बघितले आहेत.१९९२ साली त्यांनी पत्रकार म्हणून सुरुवात केली.तो काळ आणि आजचा काळ यात जमीन आस्मानाचा फरक आहे कारण त्यावेळेस प्रत्यक्ष बातमी लिहायला लागायची व घटनास्थळी जाऊन माहिती घ्यावी लागायची.ती बातमी लिहून ते पाकीट वाहका जवळ द्यायचे व बातमी छापून यायची वाट बघायची.त्यांनी अनेक पत्रकार घडविले.त्यांनी विवेक सिंधु,अजिंठा, गावकरी,चंपावती पत्र, सर्वसाक्षी,देवगिरी तरुण भारत,सोलापूर तरुण भारत,अशा अनेक वर्तमानपत्रातून काम करून त्यांनी पत्रकारितेचा प्रवास आज पर्यंत जपला आहे. आज ते स्वतःचे साप्ताहिक केज परिसर १४ वर्षापासून सांभाळतात व केज तालुक्यात प्रथम अधिस्वीकृतीधारक पत्रकार होण्याचा मान त्यांनाच मिळाला पण कधीही त्याचा त्यांनी गर्व केला नाही.आजही त्यांच्या विनम्र स्वभाव व हसतमुख चेहरा पाहून त्यांच्याकडून आणि गोष्टी शिकण्यासारख्या आहेत १९९५ ला युवा पत्रकार संघटना स्थापन केली.त्यानंतर त्यांनी जनतेसाठी व शेतकरी असो शैक्षणिक असो अनेक समस्यांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले.आज वयाची साठ वर्ष पूर्ण झाली असे त्यांच्याकडे बघून वाटत नाही.पत्रकारितेतील अनेक किस्से ते सांगताना म्हणतात की, लिफाफा पासून एक रुपयाच्या कॉइंन बॉक्स, फॅक्स,टेलिफोन ई-मेल ते आजच्या अँड्रॉइडफोन पर्यंत त्यांनी अनुभव घेतलेला आहे.त्यांच्या पासून खूप काही शिकण्यासारखे आहे त्यांच्या उर्वरीत आयुष्याला समृद्धी लाभो व पत्रकारितेची सेवा अजूनही त्यांच्या हातून घडो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.पत्रकार, संपादक श्री.सतीश केजकर यांना वाढदिवसाच्या निमित्ताने उदंड आयुष्याच्या खुप खुप शुभेच्छा आपल्या हातातुन अशीच समाज सेवा घडावी हिच ईश्वर चरणी प्रार्थना.



# आहेर वाहेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत साहित्याची तोडफोड करून अभिलेखांची नासधूस

आहेर वाहेगाव : गेवराई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहेर वाहेगाव येथे अनोळखी व्यक्तीकडून शाळेचे कुलूप तोडून तसेच वरचे पत्रे काढून वर्गखोलीत तोडफोड करून शाळेचे महत्त्वाचे अभिलेख फाडून नासधूस केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून चौकशी सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अनोळखी व्यक्तीने दोन वर्गाचे कुलूप तोडून आत शिरून वर्गातील खुर्च्या-टेबलं आणि बाके तोडले व उलथवली, तसेच कपाट तोडून शाळेचे दैनंदिन अभिलेख, परीक्षा पेपर, महत्त्वाचे नोंदणी रजिस्टर फाडून नुकसान केले. पंके तसेच वरचे पत्रे सुद्धा तोडून फेकले. वर्गात सिगरेट व गुटखा खाऊन थुकल्याचे दिसून येत आहे. घटनेची माहिती समजताच शाळा परिसरात खळबळ उडाली. याबाबत गावाचे सरपंच आणि शाळेचे मुख्याध्यापक यांनी गेवराई पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

शाळेची दयनीय अवस्था बदलण्याची गरज

या घटनेने शाळेची जीर्ण अवस्था पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. सध्या शाळेत पुरेशा वर्गखोल्या नसल्याने तीन वर्ग पत्र्याच्या शेडमध्ये चालवले जात आहेत. ग्रामपंचायतीकडून शाळेकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत





असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. चौदाव्या आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून शाळेसाठी अपेक्षित निधी खर्च करण्यात आला नाही. शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, ज्यामुळे अशा घटना रोखणे कठीण झाले आहे.

शौचालय बांधकामात ठेकेदाराने अर्धवट काम करून निधी उचलल्याचे आरोप आहे. शिक्षकांनी स्वखर्चाने लावलेली झाडेही तोडण्यात आल्याची तक्रार आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नसून नळ नाही, बोअरवेल नादुरुस्त आहेत. शाळेत भौतिक सुविधांचा पूर्ण अभाव आहे.

गावातील स्थानिक नागरिकांनी या प्रकरणी संताप व्यक्त केला आहे. सरकारी जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी गावातील जागरूक पालक, युवा पिढी आणि ग्रामस्थांनी शाळेची दयनीय अवस्था दुरुस्त करून शाळेच्या विकास करण्यासाठी एकत्र येऊन 'गावाची शाळा' साठी काम करण्याची गरज आहे. एवढे मोठे गाव असूनही गावातील शाळेची अशी अवस्था असणे चिंताजनक आहे. शाळेला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शाळेच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न झाले तरच ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था मजबूत होईल, असे मत व्यक्त होत आहे.

# महिलांच्या हातातून मोबाईल पळवणारी टोळी शिवाजीनगर डीबी पथकाने पकडली


## शिवाजीनगर पोलिसांची आठवड्यातील दुसरी चांगली कामगिरी

बीड:-शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये आज चोरट्यांनी शिवाजीनगर पोलिसांना एक मोठे आव्हान तयार केले होते. दिवसाढवळ्या महिलांच्या हातातील मोबाईल हिसकावून घेऊन तीन मोटरसायकलस्वार धुमाकूळ घालत होते. दहा ते वीस मिनिटांच्या अंतराने त्यांनी एका पाठोपाठ एक तीन मोबाईल पळवले.

पहिली घटना : अश्विनी कृष्णा सुर्वे, या दीप हॉस्पिटल कडे जात असताना, स्वराज्य नगर कमान समोर त्या फोनवर बोलत जात असताना त्यांचा मोबाईल तीन मोटरसायकलस्वारांनी हिसकावून पळवून नेला.

दुसरी घटना : मिराबाई बाळू मुळीक, राहणार जुना धानोरा रोड बडगुजर कॉलनी, या आपल्या दोन मैत्रिणींसोबत सरस्वती विद्यालयासमोरून दळण घेऊन जात असताना त्यांच्या हातातील मोबाईल यातील पाठीमागे बसलेल्या चोरट्याने हिसकावला.

तिसरी घटना : के. एस. के. कॉलेज समोरून जात असताना नर्स महिला यांच्या एप्रनच्या खिशात असलेला मोबाईल चोरट्यांनी हिसकावला.एका मागोमाग एका, पाठोपाठ १५ ते २० मिनिटांच्या अंतराने घडलेल्या या घटनांमुळे शिवाजीनगर पोलिसांसाठी चोरटे



पकडणे हे मोठे आव्हान होते. परंतु, शिवाजीनगरच्या डीबी पथकाने तात्काळ कारवाई करत एकूण पाच पथके तयार केली, दोन ठिकाणी नाकाबंदी लावल्या आणि यातील चोरट्यांना दोन तासांच्या आत पकडण्यात पोलिसांना यश आले. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी महिलांना लक्ष्य करून अशाप्रकारे मोबाईल चोरण्याची कबुली दिली आहे. त्यांच्या ताब्यातून एकूण नऊ मोबाईल रिकव्हर करण्यात आले आहेत.

१. आवेश खान खाजा शेख, वय २२ वर्षे, राहणार कानडी रोड, कोकीज पीर दर्गाजवळ, पहिली गल्ली, केज.२. गणेश श्रीराम मुंडे, राहणार किल्ले धारूर रेस्ट हाऊस जवळ, किल्ले धारूर, बीड.

# नंदिग्राम एक्सप्रेसमधील डब्बे कपात; सर्वसामान्य प्रवाशांवर अन्याय?

## १५ जूनपासून नवी रचना लागू; १८ ऐवजी १६ डब्बे, स्लीपर कोच ८ वरून थेट ५ वर

किनवट, दि. १५ : मुंबई (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते बल्लारशाह दरम्यान धावणाऱ्या ११००१/११००२ नंदिग्राम एक्सप्रेसच्या डब्बा संरचनेत मध्य रेल्वेने मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला असून १५ जून २०२६ पासून मुंबईहून आणि १७ जूनपासून बल्लारशाहहून ही गाडी आधुनिक डब्ल्ह डब्यांसह धावणार आहे. सुरक्षेच्या आणि आधुनिक सुविधांच्या दृष्टीने हा बदल स्वागतार्ह असला तरी गाडीतील एकूण डब्ब्यांची संख्या कमी करणे आणि सर्वसामान्य प्रवाशांसाठी असलेले नॉन एसी स्लीपर डब्बे मोठ्या प्रमाणात कमी करणे यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या नव्या संरचनेनुसार नंदिग्राम एक्सप्रेसमधील एकूण डब्ब्यांची संख्या १८ वरून १६ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या गाडीतील सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय प्रवाशांचा आधार असलेले नॉन एसी स्लीपर कोच तब्बल ८ वरून ५ करण्यात आले आहेत.

नंदिग्राम एक्सप्रेस ही केवळ एक रेल्वेगाडी नसून मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणा सीमावर्ती भागातील लाखो प्रवाशांची जीवनवाहिनी मानली जाते. मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिक परिसरात रोजगारासाठी स्थायिक झालेल्या नांदेड, किनवट, माहूर, हिमायतनगर, आदिलाबाद, भोकर, हदगाव, पुसद आणि यवतमाळ परिसरातील हजारो नागरिकांसाठी ही गाडी अत्यंत महत्त्वाची आहे. वर्षभर या गाडीला मोठी गर्दी असते. उन्हाळी सुट्ट्या, सण-उत्सव आणि विवाह हंगामात तर आरक्षणासाठी अनेक आठवडे प्रतीक्षा यादी दिसून येते. अशा परिस्थितीत डब्बे वाढविण्याऐवजी कमी करण्याचा निर्णय कोणत्या अभ्यासाअंती घेतला गेला, असा प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.देशातील अनेक प्रमुख एक्सप्रेस गाड्या २० ते २५ किंवा त्यापेक्षाही अधिक डब्ब्यांसह धावत असताना नंदिग्राम एक्सप्रेस सारख्या गर्दीच्या गाडीतील डब्बे कमी करण्यामागचे कारण काय, याचे समाधानकारक उत्तर रेल्वे प्रशासनाने नागरीकांना द्यावे. प्रवासी संघटनांच्या मते, डब्ल्ह डब्यांमुळे सुरक्षेत वाढ होणार असली तरी त्याचा अर्थ डब्बे कमी करणे असा होत नाही. रेल्वे प्रशासनाने इच्छाशक्ती दाखविली तर २० ते २५ डब्ल्ह डब्यांची संरचना सहज उपलब्ध होऊ शकते. उलट वाढत्या लोकसंख्येचा आणि प्रवासी संख्येचा विचार करता या गाडीला अतिरिक्त स्लीपर, एसी-३ टियर आणि सामान्य डब्बे जोडण्याची गरज होती. सर्वसामान्य प्रवाशांच्या दृष्टीने सर्वात गंभीर बाब म्हणजे स्लीपर कोचांची कपात. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार, लहान व्यावसायिक आणि निम्न-मध्यमवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणात स्लीपर वर्गातून प्रवास करतात. त्यांच्यासाठी एसीचे वाढलेले डब्बे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाहीत. त्यामुळे रेल्वेच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य प्रवाशांची पिळवणूक होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. नंदिग्राम एक्सप्रेस ही केवळ रेल्वेगाडी नसून मराठवाडा-विदर्भातील लाखो लोकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेली सेवा आहे. त्यामुळे आधुनिकीकरणाच्या नावाखाली प्रवाशांची क्षमता कमी करण्याऐवजी वाढत्या गर्दीला न्याय देणारे नियोजन करणे ही काळाची गरज असल्याचे मत प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.



## इंदिरा गांधी प्राथमिक शाळा सिडको येथे पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके व नवगताचे स्वागत

नवीन नांदेड - शारदा भवन शिक्षण संस्था संचलित इंदिरा गांधी हायस्कूल सिडको येथे शाळेच्या पहिल्या दिवशी विध्यार्थी यांच्ये पुष्प देऊन नववगत विध्यार्थी यांच्ये स्वागत व पहिल्या ते सातवी वर्गातील विद्यार्थी यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले यावेळी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी व शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.१५ जुनं रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेच्या प्रांगणात रांगोळी काढून व नववगत विध्यार्थी यांच्ये स्वागत पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तर पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थी यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले यावेळी वर्ग पहिल्या वर्गातील विद्यार्थी यांची सेल्फी फोटो काढण्यात आली.नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण देशमुख कार्याध्यक्ष रमेश ठाकूर व सह कोषाध्यक्ष तिरूपती पाटील घोगरे यांच्या सह शाळेतील प्राथमिक मुख्याध्यापक आशाताई शिंदे, माध्यमिक मुख्याध्यापक वैशाली देशमुख यांच्या सह पालक यांच्यी उपस्थिती होती यावेळी पालकांच्या शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.यावेळी पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थी यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

कार्यक्रम सुत्रसंचलन वैशाली पडोळे यांनी केले, पर्यवेक्षक रमेश सज्जन, ग्रंथपाल राजेश वाघमारे, उपमुख्याध्यापक के.एस. माझाळकर, शिक्षक व्यंकट कल्याणकर, बालाजी मोटरगे, मारोती कदम,अनुसया चिलकेवार, दिलीप कदम, वैशाली पडोळे,प्रशांत धानोरकर,रंजना हिप्परगेकर, अश्विनि आकमवाड,आलीया सय्यद,विलास नरवाडे,धोडीराज पवार,अमर बयास,एस चालीकवार यांच्यी उपस्थिती होती. पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके मिळाल्याने विध्यार्थीचा आनंद व्दिगुणित झाला होता.

## इयत्ता दहावी व बारावी पुरवणी परीक्षांसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड दि. १५ जून : नांदेड जिल्हयात लातूर बोर्डाच्यावतीने १६ जून ते ८ जुलै २०२६ या कालावधीत इयत्ता १० वी व १२ वी पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहेत. इयत्ता १२ वीच्या पुरवणी परीक्षा जिल्ह्यातील १७ केंद्रावर तर इयत्ता १० वीच्या परीक्षा एकूण १४ केंद्रावर सकाळी ११ ते सायं ६ या वेळेत घेण्यात येत आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहितता २०२३ चे कलम १६३ अन्वये परीक्षा केंद्रापासून ५०० मीटरच्या परिसरात १६ जून ते ८ जुलै २०२६ रोजीपर्यत सकाळी ९ ते रात्री ७ वाजेपर्यत या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच, परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्रात १०० मीटरपर्यत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटरपर्यत सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहेत, असे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी निर्गमित केले आहेत.

## रासायनिक खत टंचाईच्या प्रश्नावरुन शिवसेना ठाकरे पक्षाचा कृषी कार्यालयावर घेराव

भोकर । प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांकडून जादा दराने खतांची विक्री केली जात असल्याच्या तक्रारींवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकारी व शिवसैनिकांनी भोकर येथील कृषी कार्यालयात धडक देत कृषी अधिकारी दिलीप जाधव यांना घेराव घातला. यावेळी कृषी दुकानदार आणि भरारी पथकाचे साटेलोटे असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

शिवसेनेचे जिल्हा संघटक सुभाष नाईक किनीकर आणि माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कृषी



अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांना खत उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असून, उपलब्ध खतांसाठीही अतिरिक्त पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना सुनील चव्हाण यांनी, खत टंचाई आणि वाढीव दरामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला.

तर सुभाष नाईक किनीकर यांनी कृषी दुकानदार आणि भरारी पथक यांच्यातील संगनमतामुळेच अशा प्रकारांना खतपाणी मिळत असल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाईची मागणी केली.

यावर कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी सर्व खत विक्रेत्यांची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला जाईल व त्यानंतर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

या आंदोलनात कृषी सहायक कराळे, दिव्यांग सेनेचे तालुकाप्रमुख विठ्ठल देवड, ज्येष्ठ शेतकरी नरसय्या मेंडेवाड, प्रकाश बोंदिरवाड, संतोष जाधव, सुनील आडे, अंकुश आडे, कल्याण कराळे यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## औषध विक्रेत्यांनी नियमाचे पालन करुन औषध विक्री करावी-अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

नांदेड :- आज नांदेड शहरातील मे. तोष्णीवाल मेडिकल्स, डॉक्टर्स लेन, नांदेड या पेढीकडून मुदतबाहय औषधाची डॉक्टराच्या चिठठीशिवाय, फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये, विना बिलांने विक्री झाल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सदरील पेढीविरूध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.

औषध विक्रेत्यांनी डॉक्टरांच्या चिठठीशिवाय फार्मासिस्टचे गैरहजेरीमध्ये विना बिलाने औषधाची विक्री करू नये. डॉक्टराच्या चिठठीवरील औषधी विक्री करतेवेळी विक्री करण्यात येत असलेल्या औषधाचा तपशील व औषधावर नमूद तपशील यामध्ये तफावत आढळून येणार नाही याची त्यांनी गांभीर्याने दक्षता घ्यावी. मुदतबाहय औषधांचे सेवनामुळे रूग्णांचे आरोग्यावर त्याचे विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मुदतबाहय औषधी विक्री होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे आवाहन सर्व औषधी विक्रेत्यांना करण्यात आले आहे. सर्व औषध विक्रेत्यांनी सतर्क राहून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ चे पालन करूनच औषधांची विक्री करावी. कायद्याचे उल्लघंन झाल्यास किंवा त्यांचेविरूध्द या प्रशासनास तक्रारी प्राप्त झाल्यास व सत्यता पडताळणीमध्ये दोषी आढळून आल्यास त्यांचेविरूध्द कडक कारवाई घेण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी. नागरिकांनी अशा प्रकारची औषधी विक्री होत असल्याचे आढळून आल्यास, त्यांनी तात्काळ प्रशासनाकडे संपर्क साधावा जेणेकरून संबंधित पेढयाविरूध्द कारवाई करता येईल, असे सहाय्यक आयुक्त औषधे अ.तु.राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न

### पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

नवीन नांदेड: पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल,विष्णुपुरी येथे शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला,नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, टाळ्यांच्या गजरात पाठ्यपुस्तके व गणवेश देऊन,तसेच विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास मेघना कावली , मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नांदेड, वंदना फुटाणे, शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नांदेड,सुधीरजी देशमुख, अधिष्ठाता (डीन), कै. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय,नांदेड सूर्यवंशी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, सुधीर गुट्टे,गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती नांदेड, बालासाहेब कचवे, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच सुभाष खाकरे, विस्तार अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून



कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित उपस्थिती आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्व पटवून देण्यात आले. पीएमश्री योजने अंतर्गत शाळेत उपलब्ध करण्यात आलेल्या आधुनिक शैक्षणिक सुविधा,विविध उपक्रम आणि शासकीय योजनांची माहितीही यावेळी देण्यात आली.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मनापासून शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. पालकांनी देखील आपल्या पाल्यांना नियमित शाळेत पाठवून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपस्थित सर्व मान्यवरांचे पालकांचे हस्ते स्वागत आणि सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापिका उज्वला जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन एम.ए.खदिर यांनी केले तर कार्यक्रमाचे नियोजन उदय हंबर्डे सरांनी केले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी संतोष देशमुख, पद्माकर देशमुख,गंगाधर पाटील, शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले...

## हदगाव तालुक्याला अखेर मिळाले पुरवठा निरीक्षण अधिकारी

### मोनाली भवरे यांनी स्वीकारला पदभार

तामसा (प्रतिनिधी)

गेल्या काही काळापासून रिक्त असलेल्या हदगाव तालुका पुरवठा विभागाच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी पदावर अखेर नवीन नियुक्ती झाली आहे. नवनियुक्त अधिकारी मोनाली प्रमोद भवरे यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यातील पुरवठा विभागाच्या कामाला आता अधिक गती मिळण्याची चिन्हे आहेत.

*कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार*

मोनाली भवरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर, हदगाव पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा जाहीर सत्कार केला आणि पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. हदगाव तालुक्यात पुरवठा निरीक्षण अधिकारी पद प्रभारी असल्याने अनेक प्रशासकीय कामांवर याचा परिणाम होत होता. मात्र, आता पूर्णवेळ अधिकारी मिळाल्याने रेशनिंग व्यवस्था,




अन्नधान्य वितरण आणि नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण जलद गतीने होईल, अशी आशा नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

या सत्कार प्रसंगी पुरवठा विभागातील सर्व वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचारी, लिपिक आणि इतर विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. नवीन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील पुरवठा साखळी अधिक पारदर्शक आणि गतिमान होईल, असा विश्वास कर्मचाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग, वडवणी येथे नवीन इमारतीत शाळेचा शुभारंभ

वडवणी /प्रतिनिधी

दिनांक १५/०६/२०२६ सोमवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग, वडवणी येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी उभारण्यात आलेल्या नवीन शाळा इमारतीत शाळेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावी, या उद्देशाने स्वागत



समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास वडवणी नगरी चे नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, नगरसेवक नागेश भाऊ डिगे, जेष्ठ नेते महादेव भाई उजगरे, नगरसेवक सुनील ढोले, माजी सरपंच अरुण भाऊ गुरसाळी, पत्रकार शंकर झाडे, पत्रकार लहू खारगे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश टकले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष गणेश म्हेत्रे,शाळेचे मुख्याध्यापक लतीप सर , आळणे सर, पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देत नियमित शिक्षण घेऊन उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले.

नवीन इमारतीमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार असून शाळेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा येथे प्रवेश उत्सव उत्साहात

### भौतिक सुविधांच्या अभावाचा मुद्दा चर्चेत

तामसा, प्रतिनिधी :

पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीमध्ये नव्याने दाखल झालेल्या चिमुकल्यांच्या किलबिलाटने शाळा परिसर आनंदमय झाला होता. यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत फुले, मिठाई व विविध उपक्रमांच्या माध्यमातून करण्यात आले.

प्रवेश उत्सव कार्यक्रमाला जिल्हा परिषद नांदेड शिक्षण विभागाचे लेखाधिकारी निळकंठ पाचंगे तसेच पीएमश्री समन्वयक अधिकारी अर्चना वात्रवाले, गटविकास अधिकारी आडेराघो, पंचायत समिती अभियंता नाळंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. मात्र, कार्यक्रमादरम्यान पालकांनी शाळेतील भौतिक सुविधांच्या अभावाचा मुद्दा अधिकाऱ्यांसमोर ठामपणे मांडला.

मराठवाडा विभागातील विद्यार्थी संख्येनुसार सर्वात मोठ्या जिल्हा परिषद शाळांपैकी एक असलेल्या या शाळेत मुलींसाठी स्वतंत्र व पुरेशी शौचालय व्यवस्था नसल्याची तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा अपुरी असल्याची तक्रार पालकांनी केली. या सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे पालकांनी सांगितले. संबंधित समस्या तातडीने सोडविण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.कार्यक्रमास मुख्याध्यापक देविदास अक्कमवाड, डॉ. प्रज्ञान भोजनकर, लक्ष्मण चव्हाण, शेख नसीर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन कल्याणकर, सदस्य संजय सोमेवाड, शिवराज वारकड, देविदास वारकड, उपाध्यक्ष प्रतिनिधी जावेदभाई, तसेच पालक तेजस उंबरकर, निलेश निल्लावार, गजानन शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर व पालक उपस्थित होते.प्रवेश उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संदेश देण्यात आला. तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांची पूर्तता करण्याबाबतही उपस्थितांनी अपेक्षा व्यक्त केली.